म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



# सप्त चिरंजीव

ग. गो. बोडस

REFBK-0013222

बलवन्त पुस्तक भाण्डार, मुंबई ४

मराठी रंगभूमीचे

# सप्त चिरंजीव

लेखक

गणेश गोविंद बोडस

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. क्र. १३२२२
संदर्भ शाखा

REFBK 0013222

क्रमांक REFBK-0013222 ८०

बलवन्त प्रकाशन
बलवन्त पुस्तक भाण्डार
गिरगांव नाका, मुंबई नं. ४

: प्रकाशक :

त्रिं. वि. परचुरे,

बलवन्त पुस्तक भाण्डार,

गिरगव–मुंबई ४

*

: मुद्रक :

शि. गो. भावे, (मॅनेजिंग डायरेक्टर)

विमा मुद्रक आणि प्रकाशक, लिमिटेड

सातारा यांचा विमा छापखाना.

*

: मुखपृष्ठ :

वसंत चिटणकर

भांडुप, मुंबई ७८

*

: ब्लॉक्स :

मे. गुप्ता ब्रदर्स, मुंबई १२

: प्रथमावृत्ति :

भाऊराव कोल्हटकर

जन्मशताब्दि दिन

९ मार्च, १९६३

*

: किंमत :

एक रुपया, पन्नास नये पैसे

कै. भाऊराव कोल्हटकर
यांच्या गुणस्मृतीस अर्पण

—गणेश गोविंद बोडस

# प्रस्तावना

मिरजेचे राजेसाहेब श्रीमंत तात्यासाहेब पटवर्धन यांना, जुन्या जमान्यांतील दोन संगीत नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर व गोविंदराव देवल, संगीत नट मोरोबा वाघोलीकर, भाऊराव कोल्हटकर, बाळकोबा नाटेकर, आणि गद्य नट गणपतराव जोशी व बाळाभाऊ जोग या सात कलावंतांबद्दल नितांत आदर असल्यामुळे, त्यांनी मला या कलावंतांचीं चरित्रें लिहिण्याचा आग्रह केला. 'माझी भूमिका' या माझ्या आत्मचरित्रांत या सातहि कलावंतांविषयीं मी प्रसंगोपात विवरण केलेलें आहेच. तरीहि श्रीमंत तात्यासाहेबांनी सांगतांच मीं हें चरित्रलेखनाचें काम हातीं घेतलें. कारण हे सातहि कलावंत मला स्वतःला आदरणीय वाटतात. त्यांचें गुणसंकीर्तन मला करावेंसें वाटलें, म्हणून एक वर्षापूर्वीच हीं सात चरित्रें लिहून मीं श्रीमंत तात्यासाहेब पटवर्धन यांना दिलीं. ते त्यांचें प्रकाशन सवडीने करण्याच्या विचारांत होते.

दरम्यान भाऊरावांच्या जन्मशताब्दीचा यंदा योग आला. त्यासंबंधी श्री. र. गो. सरदेसाई यांनीं माझ्याशीं सुरू केलेल्या पत्रव्यवहारांतून ह्या चरित्रांच्या प्रकाशनाचा योग आज येत आहे. आमच्या ह्या बेताला श्री. राजेसाहेब मिरज यांनी आनंदाने संमति दिली.

अण्णासाहेब किर्लोस्करांचें चरित्र कै. शंकर बापूजी मुजुमदारांनी १९०४ सालींच लिहिलें होतें. त्या चरित्राचा उपयोग करून मीं अण्णासाहेबांचें चरित्र लिहिलें आहे. गो. ब. देवल, भाऊराव कोल्हटकर, गणपतराव जोशी यांचींहि चरित्रें मराठींत प्रसिद्ध झालेलीं आहेत. या 'सप्त चिरंजीवां'पैकीं अण्णासाहेब किर्लोस्करांच्या निधनसमयी माझें वय पांच वर्षांचें होतें. उरलेल्या सर्व कलावंतांशीं माझा प्रत्यक्ष परिचय होता. शिवाय या सर्वांशीं चांगला परिचय असलेल्या अनेकांनी वेळोवेळीं मला त्या त्या कलावंतांविषयी अनेक हकीकती सांगितलेल्या आहेत. या सर्व सामुग्रीचा उपयोग करून मीं हीं चरित्रें यथामति लिहिलीं आहेत.

भाऊराव कोल्हटकरांच्या जन्माला यंदा शंभर वर्षें होत आहेत. भाऊराव आणि मोरोबा या दोघांच्या बरोबर रंगभूमीवर भूमिका

करण्याचें सद्भाग्य मला लाभलें आहे. १८९५ ते १९०० या सहा वर्षांत मीं भाऊरावांबरोबर पुढील भूमिका केल्या आहेत.

शाकुंतल — अनसूया, ऋषिकुमार, सहाव्या अंकांतील एक दासी

सौभद्र — सारंगनयना, कुसुमावती, रुक्मिणी — (भाऊराव कृष्ण १८९८)

रामराज्यवियोग — कौशिनी, मालिनी

विक्रमोर्वशीय — निपुणिका, राणी

शापसंभ्रम — तरलिका, कादंबरी

मृच्छकटिक — नटी, रदनिका, मदनिका, धूता, मांग

शारदा — गोरख, शंकराचार्य

वीरतनय — मालिनी

भाऊराव, मोरोबा, देवल यांचा प्रत्यक्ष सहवास मला कांही वर्षें लाभलेला आहे. गणपतरावांशीं माझा पुष्कळ परिचय होता. या पुस्तकांतील सातहि महान व्यक्तींबद्दल माझी पूज्य भावना असल्यामुळे त्यांच्या गुणसमुच्चयाचा मी ऋणाईत आहें. मी साहित्यिक नाही; नट आहे. तरीहि या "सप्त चिरंजीवां"च्या पूज्य स्मृतीचें ऋण अंशतः फेडण्यासाठीच मीं त्यांचें यथाशक्ति गुणगान केलें आहे.

मिरज

ता. १४–२–१९६३

माघ कृष्ण षष्ठी, शके १८८४

गणेश गोविंद बोडस

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रमांक ३.४.८०१२ वि: चरित्र
नोंद क्रमांक ११८२ नों. दि. २०/३/८२

# अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | अण्णासाहेब किर्लोस्कर | ११ |
| २. | गोविंद बल्लाळ देवल | २७ |
| ३. | मोरोबा वाघोलीकर | ४५ |
| ४. | बाळकोबा नाटेकर | ५३ |
| ५. | भाऊराव कोल्हटकर | ५९ |
| ६. | गणपतराव जोशी | ७५ |
| ७. | बाळाभाऊ जोग | ८१ |

# बलवंत प्रकाशन

आमचें हें ८० वें प्रकाशन आमच्या रसिक मराठी वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला फार आनंद होत आहे.

चांगल्या लेखकांनीं लिहिलेलीं गुणपूर्ण मजकुराचीं चटकदार पुस्तकें शक्य तितक्या कमी किंमतींत मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्याचा आमचा सतत प्रयत्न चालू असतो. या कामांत आम्हांला आमच्या लेखकांचें बहुमोल साहाय्य होत असतें हें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें आमचें कर्तव्य आहे.

नटवर्य श्री. गणपतराव बोडस यांनी लिहिलेल्या सात नामवंत मराठी नटांचीं हीं अल्प चरित्रें आज प्रसिद्ध करण्याचा अवचित योग जमून आला. सुविख्यात गायक-नट कै. भाऊराव कोल्हटकर यांची जन्मशताब्दि यंदा येते आणि त्यांचा चरित्रलेख श्री. बोडस यांनी लिहिला आहे, असें कळल्यावरून हा प्रकाशनाचा विचार मनांत आला. भाऊरावांच्या बरोबरच अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंदराव देवल, मोरोबा वाघोलीकर, बाळकोबा नाटेकर, गणपतराव जोशी व बाळाभाऊ जोग या आणखी सहा श्रेष्ठ नाट्यकलावंतांचेहि चरित्रलेख वाचकांना सादर करण्याचा योग जमून आला याचा आम्हांला साहजिकच आनंद होतो.

श्री. गणपतराव बोडस यांनी भाऊराव कोल्हटकरांबरोबर रंगभूमीवर पांच सहा वर्षें कामें केलेलीं आहेत. पुस्तकांतील इतरहि बहुतेक कलावंतांशीं गणपतरावांचा कमीअधिक प्रमाणांत प्रत्यक्ष परिचय होता. किर्लोस्कर नाटक मंडळींत बोडसांनी अनेक वर्षें नट म्हणून घालवलेलीं असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष आणि ऐकीव अशी माहितीहि खूपच आहे. त्यामुळे ह्या चरित्रग्रंथाला एक प्रकारचें मोल आणि महत्त्व आलेलें आहे.

हें पुस्तक प्रकाशनासाठीं आम्हांला दिल्याबद्दल नटवर्य श्री. गणपतराव बोडस यांचे आम्ही फार आभारी आहोंत. सुप्रसिद्ध नाट्यसमीक्षक व पत्रकार श्री. र. गो. सरदेसाई यांच्या साहाय्यामुळेच या पुस्तकाच्या प्रकाशनाचा योग येत आहे. तथापि त्यांचे आभार मानून मोकळे होण्याऐवजी सतत त्यांच्या ऋणांत राहणेंच अधिक बरें !

बलवंत पुस्तक भांडार, मुंबई ४
ता. २३-२-१९६३

त्र्यं. वि. परचुरे

॥ सप्तैते चिरजीविनः ॥

# मराठी रंगभूमीचे सप्त चिरंजीव



श्री अण्णासाहेब किर्लोस्कर



श्री गोविंद बल्लाळ देवल



श्री बाळकोबा नाटेकर



श्री भाऊराव कोल्हटकर



श्री. मोरोबा [illegible]पोलीकर



श्री. [illegible]पतराव जोशी



[illegible] जोग



**नीलकंठेश्वर मंदिर**, बडोदा.

भाऊराव कोल्हटकर यांचें जन्मस्थान.

# १ : अण्णासाहेब किर्लोस्कर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम ......
क्रमांक
दा. क. 13222

बलवंत पांडुरंग ऊर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्म धारवाड जिल्ह्यांतील गुर्लहोसूर येथे ता. ३१ मार्च १८४३ रोजीं झाला; आणि त्याच वर्षी आधुनिक मराठी रंगभूमीचा जन्म झाला. विष्णुदास भावे यांनी 'सीता स्वयंवर' या नाटकाचे प्रयोग नोव्हेंबर १८४३ मध्येच सुरू केले. विष्णुदास भाव्यांनीं सुरू केलेल्या पौराणिक नाटकांच्या चाकोरींतून रंगभूमीला अण्णासाहेबांनीच बाहेर काढलें.

अण्णासाहेबांचें जन्मगांव गुर्लहोसूर घटप्रभा नदीच्या काठीं पसरलेलें आहे. चिदंबर दीक्षित या नांवाचे एक सत्पुरुष पेशवाईच्या अखेर या गावीं राहत असत. पेशवाईतील शेवटचा सेनापती बापू गोखले याचे हे गुरु. अशा पुण्यभूमींत अण्णासाहेबांचा जन्म झाला. त्यांचें मराठी व कानडी प्राथमिक शिक्षणहि तेथेंच झालें. पुढील शिक्षणासाठी ते कोल्हापुरास गेले व तेथे इंग्रजी दुसऱ्या इयत्तेपर्यंत शिकले. १८६३ मध्ये पुढील शिक्षणासाटी अण्णासाहेबांना पुणे येथे पाठवण्यांत आले. पण याच काळांत या नटेश्वराच्या उपासकाचा नाट्यप्रेमाचा आविष्कार झाला व शिक्षण संपलें.

गुर्लहोसूर येथे वयाच्या अठराव्या वर्षी मुलकीची परीक्षा दिल्यानंतर, अण्णासाहेबांच्या काव्यरचनेस प्रारंभ झाला. हरिदासांना पद्यमय आख्यानें करून देणेस त्यांनी सुरुवात केली. त्यांचे वडील पांडुरंगराव तात्या चांगले संस्कृतज्ञ होते. त्यांचेपाशीं रघुवंश व अभिज्ञानशाकुंतल या ग्रंथांचा अभ्यास अण्णांनी केला.

गुर्लहोसूर येथे अण्णासाहेब असतांना आद्य शंकराचार्यांचा जयंती उत्सव त्यांनीं सुरू केला. त्यांचे सहाध्यायी व आतेभाऊ 'गीतामृत-शतपदी'-कर्ते खंडो कृष्ण ऊर्फ बाबा गर्दे व इतर तरुण मंडळी या उत्सवांत सामील

असत. तो उत्सव वैशाख शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत पंधरा दिवस चाले. दर दिवशींच्या वाहनाचें एक एक पद करून तें म्हणण्यांत येई. पौर्णिमेच्या दिवशीं श्रीमत् शंकराचार्यांचा गुहाप्रवेश होईतोंपर्यंत उत्सव चाले. शिवाय अण्णासाहेबांनी नित्य म्हणायचीं पंचपदीचीं पदें केलेलीं होती. तीं पदें किर्लोस्कर मंडळींत त्रीचं वर्षे रोज रात्रौ भोजनोत्तर साथीसह सर्वांनीं म्हणावयाची वहिवाट असे. कालमानाप्रमाणे त्यांत पुढे खंड पडत गेला.

पुण्यास कसबा पेठेंत केदारेश्वराच्या बोळांतील एका घरांत अण्णासाहेबांनी एका पौराणिक नाटक कंपनीची स्थापना केली. या वेळीं पौराणिक नाटकें महाराष्ट्रांत चोहोकडे सुरू झालेलीं होतीं. त्याचें आकर्षण मनावर असल्याने, कांही पौराणिक नाटकेंही त्यांनी चालू केली असावीं. स्वलिखित अशीं नाटकें ‘ विक्रमचरित्र ’, ‘ एलफिन्स्टन व बाजीराव ’ हा फार्स हीं बसवून त्यांनीं अहमदनगर, तेथून मालेगांव [ खानदेशांतील ] येथे प्रयाण केलें. त्यांच्या नटवर्गांत सुमेरसिंगाच्या भूमिकेमुळे पुढे प्रसिद्धीस आलेले सुप्रसिद्ध नट गोपाळराव दाते हे स्त्री-भूमिका करीत असत. स्वतः अण्णासाहेब रामाची भूमिका करीत. ही गोष्ट गोपाळराव दाते यांच्या तोंडून मीं ऐकली. मालेगांवला कंपनी मोडकळीस आली. कंपनीचें किरीटकुंडलें यासारखें सामान अण्णासाहेबांनी कानांतील भिकबाळी विकून केलें, असेंही दाते यांनी सांगितलें. कंपनी मोडकळीस आली असतां अण्णासाहेबांचे वडिलांनी हरभट खरे या इसमास अण्णासाहेबांच्या शोधास पाठविलें. त्यांनी शोध काढीत काढीत मालेगांव गाठून अण्णासाहेबांचें मन वळवून, कंपनी बंद करवून, ते अण्णासाहेबांना घेऊन गुर्लहोसूर येथे आले.

त्यांनी शिवचरित्रावर पांचशे आर्या रचल्या होत्या, परंतु त्या काव्याला बक्षीस मिळालें नाहीं. तदनंतर ते बेळगावास गेले. तेथे अँग्लोव्हर्नॅक्युलर स्कूलमध्ये त्यांनी मास्तरची नोकरी धरली. त्यांच्या वर्गांत गोविंद बल्लाळ देवल हे एक विद्यार्थी होते. येथपासूनच या दोघांचा गुरुशिष्य हा संबंध आला. बेळगाव येथे असतांना त्यांनी “ शांकर दिग्जय ” हें गद्य नाटक लिहिलें.

त्याबद्दल संकेश्वर मठाच्या जगद्गुरूंनी त्यांना शालजोडी देऊन त्यांचा बहुमान केला. बेळगावास मास्तर असतांना त्यांनी 'शिमगा पुराण' नांवाचें, त्या नांवाला योग्य असें, काव्य रचलें. त्यांत त्या वेळीं बेळगावांत जी बडी बडी प्रतिष्ठित मंडळी होती त्यांचीं अनेक कुलंगडीं बाहेर काढलीं होतीं. त्या शिमगा उत्सवानें बेळगावांत खूप गंमत उत्पन्न झाली.

त्या वेळीं पौराणिक नाटक कंपन्या बेळगावांत येत. अण्णासाहेब त्या नाटक मंडळींच्या बिऱ्हाडीं नेहमी पडलेले असत. त्यांना पद्यमय आख्यानें रचून देत. त्या वेळीं बेळगावांत "रसरत्नाकर" व "भरतशास्त्रोत्तेजक" अशा दोन नाटक मंडळयांची स्पर्धा चालू असे. रत्नाकर नाटक मंडळीची चलती होती व भरत शास्त्रोत्तेजक मंडळी हलाखींत होती. तिला उचलून भरभराटीला आणण्यासाठी व दुर्बलांना हात देण्यासाठी, त्यांनी त्या कंपनीला निरनिराळीं आख्यानें लिहून दिलीं. परंतु ती कंपनी नांवालौकिकास येईना. तेव्हा एका आख्यानांतील पद्यांत त्यांनीं एक चरण असा घातला की, "नीच रसरत्नाकरीं बलवंत कुंभज खवळला." म्हणजे अगस्ती ऋषीप्रमाणे हा नीच रसरत्नाकर मी गिळून टाकीन असें चिडीने त्यांनी लिहिलें.

अण्णासाहेबांनी पोलीस जमादाराचीही नोकरी केली. परंतु पोलिसी पेशा त्यांना अगदी मानवला नाही. एका माणसावर चॅप्टर केस भरण्यासाठी त्याच्या खिशांतली वस्तु चोरीची आहे, हें ठरविण्यासाठी एक वस्तु त्याच्या खिशांत टाकण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यांनी ती पोलीस खात्यांतली नोकरी सोडली व मग मध्यभाग कमिशनर क्राफर्ड यांच्या ऑफीसमध्ये नोकरी धरली. या वेळीं नानासाहेब साठे हे त्यांचे वरिष्ठ अधिकारी होते व भानगांवकर [पुढे डेप्युटी कलेक्टर झाले] हे सहकारी होते. अण्णासाहेब आपल्या ऑफिसच्या मंडळींत त्यांच्या आंगच्या अनेक गुणांमुळे लोकप्रिय होते. कचेरींत गेल्यावर खुंटीला अंगरखा पागोटें ठेवून, पुढील डेस्कवर पाय पसरून व बसायच्या गादीवर उपरणें पांघरून खुशाल झोप घेत. त्यांच्याकडचें काम त्यांच्यावर प्रेम करणारी इतर कारकुन मंडळी उरकुन टाकीत. क्राफर्ड साहेब कचेरीत नित्यनेमानें येतच असत असें नव्हतें. एखाद्या दिवशीं साहेब येतो असें कळल्यावर, साहेब ऑफिसमध्ये आल्यावर, इतरांनी त्यांना उठवावें.

लहर लागली तर उठत, नाही तर तसेच घोरत पडत. जरूर वाटली तर मुद्दाम त्यांना उठवून त्यांच्या डेस्कवर कामाचे कागद आणून ठेवावे. कमिशनर कचेरी गोकाक मुक्कामीं दौऱ्यावर असतां एक दिवस सकाळीं अण्णासाहेब व भानगावकर तंबूंत बुद्धिबळाचा डाव मांडून खेळत होते. डाव रंगांत आला असतां वरिष्ठ अधिकारी साठे यांचेकडून अण्णासाहेबांना बोलावण्याकरिता चपराशी आला; साठे साहेबांनी " बेगी बेगी " बोलावलें आहे, असें सांगूं लागला. त्याला अण्णासाहेबांनी सांगितलें, " येतों " म्हणून सांग. डाव रंगत होता. कांही वेळाने पुन्हा चपराशी येऊन " बोलावलें " आहे असें सांगूं लागला. त्याला अण्णासाहेबांनी पुन्हा सांगितलें की, " एवढा डाव झाल्यावर येतो असें कळीव. " पुन्हा डाव सुरू झाला. कांही वेळाने पुन्हा चपराशी येऊन सांगूं लागला की " साठे साहेब फार गरम झाल्याती, तवा बेगी बेगी चला. " त्यावर अण्णासाहेबांनी उत्तर दिलें " साठे साहेबांना सांग की, मीं नोकरी सोडून दिली. " अशा प्रकारें ऑफिसचें काम चालू होतें. परंतु सर्वच लोक अण्णासाहेबांच्या गुणांवर लुब्ध असल्याने असले प्रकार सर्व खपून जात होते.

यानंतर कमिशनरचें ऑफिस पुण्यास आल्यावर दैनंदिनी सुरू असतां तेथे मुंबईची एक पारशी ऑपेरा कंपनी आली. तिचा इंद्रसभा प्रयोग पाहून त्यांना कल्पना सुचली की यांत नुसतीं पद्येंच आहेत, त्याऐवजी गद्यपद्यात्मक असें नाटक रचलें तर काय बहार होईल? नंतर त्यांनीं लागलीच 'शाकुंतल' नाटकाचें संस्कृतांतून मराठींत रूपांतर करावयाचें ठरविलें. वडिलांच्या जवळ संस्कृताचा अभ्यास करतांना ते शाकुंतल शिकले होतेच.

चार अंकाचें गद्यपद्यमय भाषांतर होऊन नंतर पात्रांच्या योजना करण्याकडे त्यानी लक्ष पुरविलें. मोरोबा वाघोलीकर दुष्यंताचे कामासाठी निवडले. कण्वाच्या भूमिकेसाठीं बाळकोबा नाटेकर या गाननिपुण गृहस्थांची निवड केली. सुंदर रूपसंपदा व प्रमाणबद्ध बांध्याचे शंकरराव मुजुमदार यांना शकुंतलेची भूमिका ठरविली. स्वतः अण्णासाहेबांनी सूत्रधार, शार्ङ्गरव व मारीच या भूमिका स्वीकारल्या. बाकी पात्रांची निवड ऑफिस-

मधील मंडळीमधून केली. लागलीच तालमीला सुरुवात झाली. शुक्रवार पेठेंत वाळवेकरांच्या हवेलींत (येथें पुढे सार्वजनिक सभा होती) तालमी सुरू झाल्या. तालमीला केरूनाना छत्रे वगैरे रसिक मंडळी येऊन तालमीच्या वेळीं चर्चा वगैरे होत असत. रंगीत तालीम ता. १३ आक्टोबर १८८० सालीं झाली. १८८० ता. ३१ आक्टोबर रोजीं धनत्रयोदशीच्या सुमुहूर्तावर पहिला 'शाकुंतल'चा प्रयोग बुधवारांतील आनंदोद्भव थिएटरमध्ये झाला. सदर थिएटर भांग्या मारुतीसमोर होतें.

प्रयोग सुरू होण्याचे अगोदर, पडदा उघडण्यापूर्वी, अण्णासाहेब यांनी केलेलें पद "पंचतुंड नररुंड मालधर" हें पडद्यांतूनच म्हणायचें ठरलेलें असून, पडदा उघडणाराने वरील पद सुरू झाल्याबरोबर चुकून पडदा उघडला; तेव्हापासून नांदी पडदा उघडल्यावर म्हणायची वहिवाट पडली. अण्णासाहेब सूत्रधार व पारिपार्श्वक, मधुर आवाजाचे गायनपटु, बाळकोबा नाटेकर व नाना शेवडे होते. मोरोबा दुष्यंत व वैखानस अण्णासाहेब. नंतर शकुंतलेच्या वेषांत शंकरराव मुजूमदार. शंकररावांचें सौंदर्य व शरीराचा बांधा पाहून प्रेक्षकवर्ग थक्क झाला. मोरोबांनी एकदा जुन्या गोष्टी सांगतांना असें सांगितलें की, "शंकरचा वेष पाहून मीही देहभान विसरल्यासारखा झालों व मला मी खराखुरा दुष्यंत राजा आहें असें वाटूं लागलें." बाळकोबा नाटेकर आरंभाला थोडे गांगरल्यासारखे दिसले, परंतु नंतर त्यांनी रस व भावनायुक्त मधुर आवाजाने पद्यगायन केल्यामुळे चौथा अंक संपल्यावर लोक त्या मधुर आलापांच्या धुंदींतच घरीं गेले, असें जुन्या लोकांच्या तोंडून ऐकलें आहे.

डेक्कन कॉलेजचे डॉ. किल्हार्न स्वदेशीं गेले, त्यांच्या सन्मानार्थ किर्लोस्कर मंडळीचा शाकुंतल प्रयोग झाला. त्या वेळीं अण्णासाहेब व बाळकोबा नाटेकर यांचें ऋषीवेष पाहून "प्राचीन ऋषी असे होते काय?" असे आश्चर्योद्गार त्यांनी काढले.

नंतर गद्य नायिकेवर पुढील नाटकें करायचीं नाहींत असें ठरवून 'सौभद्र' नाटकाची आखणी करण्यांत आली. सुभद्रेच्या भूमिकेसाठी पात्र

शोधण्याची खटपट सुरू झाली. तेव्हां शोध लागला की, बडोद्यास बापूबुवा कोल्हटकर म्हणून कीर्तनकार आहेत, त्यांचीं दोन मुलें देखणीं व सुस्वर आवाजाचीं आहेत. तेव्हा खटपट करून प्रथम थोरले पुत्र रामचंद्र उर्फ अप्पाराव यांस बोलावून घेतलें. त्यांचें गाणें वगैरे ऐकून त्यांस येण्याबद्दल सांगितलें. "वडील वृद्ध आहेत, त्यांची परवानगी घेऊन येतों." असें सांगून ते परत गेले. नंतर कांही दिवसांनी मोरोबा बडोद्यास जाऊन भाऊरावांस घेऊन आले. नंतर आठ दिवसांत शाकुंतलमधील नटीचें काम भाऊरावांस देण्यात आलें.

यापूर्वी नटीचें काम गजानन रेडे नांवाचे गृहस्थ करीत असत. एका प्रयोगाचे दिवशीं नटीच्या "आज मज सहज आला उल्हास" या पदाची सुरुवात वेसूर होऊन त्या गृहस्थांनीं तें पद तसें वेसूर म्हटलें. ते गाणारे नसल्याने आपण वेसूर झाल्याचें त्यांना कळलेंच नाहीं. पद संपल्यावर अण्णासाहेबांनी लोकांना ऐकूं जाणार नाही अशा रीतीने एक शिवी दिली. "शाबास, प्रिये शाबास, तुझ्या मधुर गायनाने चित्तवृत्ती गुंगून गेल्यामुळे ही सर्व सभा कशी चित्राप्रमाणे तटस्थ झाली आहे" हें म्हणतांना, ज्या तऱ्हेने वाक्य उच्चारलें, म्हणजे तुम्ही फार शहाणे आहांत हें म्हणतांना जो सर्वसाधारण उच्चार करण्याची तऱ्हा आहे त्या पद्धतीने विनोदी उच्चार केला, तो विलक्षण होता. एकदा नाटकाला सुरुवातच वेसूर होऊन मोरोबांचासुद्धा शुद्ध सूर लागेना. शेवटीं अण्णासाहेबांच्या एका पदाच्या सुरुवातीला बाळकोबा नाटेकरांनी हलक्या आवाजांत आ, आ, आ, असा सूर लावून सर्व पात्रांना सुरावर आणलें असें सांगतात.

१८८२ सालीं भाऊरावांना आणल्यावर सौभद्राचे तीन अंक बसवून झाले व १८ नोव्हेंबर १८८२ सालीं अप्पा बळवंत मेहेंदळे वाड्यानजीकच्या वखळींत पूर्णानंद नांवाचें थिएटर होतें त्या थिएटरमध्यें पहिला प्रयोग झाला. त्यांत पात्र-रचना अशी होती. अण्णासाहेब—सूत्रधार व बलराम. अर्जुन-मोरोबा वाघोलीकर; बाळकोबा नाटेकर-नारद व कृष्ण; गोपाळराव दाते—वक्रतुंड. सुभद्रा व नटी-भाऊराव कोल्हटकर; रुक्मिणी-शंकरराव मुजुमदार; घटोत्कच गोविंदराव निपाणीकर. पहिला प्रयोग तीन अंकांचा झाला. प्रयोग

झाल्यावर जिकडे तिकडे भाऊराव, व बाळकोबा यांच्या सुस्वर मधुर गायनाने लोकांना संगीताची मेजवानी वाटली.

तीन अंकांचे कांही प्रयोग पुणें, मुंबईस झाल्यावर खेळ बंद होऊन मंडळी घरोघर गेली. सौभद्राच्या पुढील दोन अंकांची रचना करण्यासाठी अण्णासाहेब मुंबईस गणपतराव किर्लोस्कर, हायकोर्ट वकील, यांचेकडे जाऊन राहिले. पुष्कळ विचार करून पुढील अंकाची सुरुवात कशी करायची हें सुचेना. एक दिवस क्राफर्ड मार्केटमध्ये गेले असतां तेथे एका काचेच्या सामानाच्या दुकानांत त्यांना एक काचेचा गणपति दिसला. हा गणपति माझ्या बुद्धीला चालना देईल, अशा विश्वासाने त्यांनी तो गणपति खरेदी केला. रात्रीं लिहिण्याच्या डेस्कवर समोर तो गणपति ठेवून अंकाच्या रचनेच्या निश्चयाने बसले. भावनेचा योगाने त्यांना अंकाची सुरुवात स्फुरली व त्यांनी दोन दिवसांत चवथा व पांचवा अंक लिहून टाकला व ताबडतोब भाऊरावांना बडोद्यास तार करून बोलावून घेतलें. पुढील हकिकत भाऊरावांच्या तोंडून ऐकलेली ती अशी– " मी ग्रँटरोड स्टेशनवर आलों, तों प्लॅटफार्मवर इतर लोकांपेक्षा उंच व डोक्यास पागोटें घातलेले अण्णासाहेब पाहिले. मला घेऊन गणपतराव किर्लोस्करांच्या शेणवीवाडींत ( गिरगांवात ) जाऊन, अगोदर घाईघाईनें, ' भाऊ, पुढचे अंक वाचून दाखवितों, मग बाकीचें, ' असें म्हणून मला चवथा व पांचवा अंक वाचून दाखविला. " नंतर तालमी घेऊन पांच अंकांच्या प्रयोगाला सुरुवात झाली.

इंदूराधिपती त्या वेळीं तुकोजीराव होळकर होते. त्यांचे युवराज शिवाजीराव [ बाळासाहेब ] होळकर त्यांनी नाट्यप्रयोग पाहून अण्णासाहेबांना इंदूर येथे मोठ्या आग्रहाने पाचारण केलें. त्याप्रमाणे कंपनी इंदुरास गेली. प्रत्यक्ष भावी राजाचें आमंत्रण; तेव्हा कंपनीची सर्व सरबराई सरकारांतूनच होती. तेथेंच प्रसिद्ध पखवाजवादनाचे आचार्य नानासाहेब पानसे; त्यांनी तयार केलेले त्यांचे सुपुत्र बाळाभाऊ पानसे; प्रसिद्ध बीनवादनकार बंदे अल्लीखां; प्रसिद्ध गायिका व बंदे अल्लींची शिष्या चुन्ना ( हिच्याशींच पुढे बंदे

अल्लींनी निका लावला, ) इत्यादिकांच्या गायन-वादनाची लयलूट अनुभवीत मंडळी राजेशाही पाहुणचाराचा उपभोग घेत, मधूनमधून प्रयोग करीत असत. महाराजांच्या इच्छेने सरकारी प्रयोग होत असत. एकदा रामराज्य-वियोग या सरकारी प्रयोगाचे दिवशीं महाराजांसह सर्व राजकुटुंबही होतें. तिसऱ्या अंकांत दरबारांत दशरथाच्या तोंडीं " गुरुजी, पुत्र कर्ते झाल्यानंतर त्यांना बाजूला ठेवून आपण लोभाने राज्यासक्त होणें चांगलें नाहीं. कारण तशा त्या राजकुमारांना मग " निरुद्योगें आलस्य शिरे वेगें । दुष्टसंगें दुर्व्यसन त्यांसि लागे । तरुणपणिं ते संपत्तिमदबलाने । नीच कामीं रत होति की सुखाने ॥ हें भाषण ऐकल्यावर, प्रकृति ठीक नाही या सबबीवर तुकोजीराव महाराज उठून गेले. दशरथाचें विधान तंतोतंत त्यांना लागूं पडत होतें. कारण युवराज शिवाजीराव होळकर आता राज्यकारभार पाहायला योग्य झाले होते. महाराज उठून गेल्यावर थोडी खळबळ उडाली.

त्या वेळीं इंदुरास असलेले महादेव व्यंकटेश लेले हे संस्थानचे इंजिनिअर होते. महाराजांचा त्यांच्यावर लोभ आणि विश्वास होता. त्यांच्याकरवी अण्णासाहेबांना महाराजांचा निरोप आला की, " मालतीमाधव " नाटकाचें संगीत रूपांतर करावें. त्यावर अण्णासाहेब म्हणाले, " मालतीमाधव रंगभूमीवर चांगलें यशस्वी होणार नाहीं. " त्यावर माधवराव लेले म्हणाले " महाराजांची नाराजी होईल. " त्यावर अण्णासाहेब म्हणाले की, " महाराज मला तोफेच्या तोंडीं देतील काय ? कवीला जें नाटक पसंत नाहीं तें करण्याची महाराजांची सक्ती कां ? "

तेथील सरकारी नाटकाचे दिवशीं प्रयोगासाठी लागणाऱ्या सामानाची यादी होती. तिच्यांत रंग, तेलें, खडीसाखर, लवंगा, अत्तर अशा जिनसा यायच्या असत. त्यांत एका प्रयोगाचे दिवशीं ठरलेलें अत्तर आलें नाही, तेव्हा अण्णासाहेबांना खासगी कारभाऱ्याची ही करामत आहे असें वाटलें. त्यांनी खासगी कारभाऱ्यास विचारलें कीं, "आजच्या सामानांत अत्तर कां आलें नाही ? " त्यावर कारभाऱ्यांनी उत्तर दिलें की, नाटकप्रयोगास अत्तराची आवश्यकता न वाटल्यामुळे अत्तर पाठविलें नाहीं. " त्यावर अण्णासाहेब म्हणाले " तें तुम्हांला ठरवायचें

प्रयोजन नाहीं. अत्तर आल्याशिवाय प्रयोगाला सुरुवात होणार नाही." त्यानंतर खासगी कारभाऱ्यांनी ठरलेप्रमाणे पांच तोळे अत्तर पाठविलें. नंतर अण्णासाहेबांनी एका समईंत वात घालायला लावून तें अत्तर त्या समईंत ओतून अत्तराचा दिवा लावला. किर्लोस्करांना अत्तराची ही किंमत आहे असें सांगितलें. खासगी कारभारी गुपचुप निघून गेले.

नंतर वऱ्हाडांत दौरा काढला. या दौऱ्याचे वेळीं बाळकोबा नाटेकर नव्हते, तेव्हा त्यांच्या भूमिका रामभाऊ किंजवडेकरांनी केल्या. परंतु पुण्यास आल्यावर त्यांनी हातपाय गाळले. पुण्यास पहिला प्रयोग सौभद्र लागला. त्या प्रयोगाचे दिवशीं गर्दी खूप झाली होती. रामभाऊंनी हातपाय गाळलेले पाहून अण्णासाहेब किर्लोस्कर टांगा करून बाळकोबा नाटेकरांच्या घरीं गेले. बाळकोबांनी सहाशे रुपये मागितले, तेव्हा प्रयोग झाल्यावर पैसे देतों, असें सांगून, त्यांना गैरविश्वास वाटूं नये म्हणून, हातांत चोवीस तोळ्यांचें सिंहमुखी कडें होतें, तें बाळकोबांस देऊन त्यांना घेऊन येऊन अण्णासाहेबांनी प्रयोगास सुरुवात केली. बाळकोबांना पाहिल्याबरोबर प्रेक्षक आनंदित झाले. मध्यंतरीं अण्णासाहेबांनी भाऊरावांस म्हटलें, "भाऊ, कांही वाटूं देऊं नकोस. प्रयोग चांगला होणेसाठी त्याला घेऊन आलों." बाळकोबांनीही त्या दिवशीं बहार केली, असें भाऊरावांनी सांगितलें.

या वेळेपर्यंत कंपनीला स्थिर स्वरूप आलें नव्हतें. येईल ती जमा व होईल तो खर्च असें चाललें होतें. त्यामुळे प्रत्येक दौऱ्याच्या शेवटीं मंडळी घरोघर जाण्याचे वेळीं कांही लोकांना द्रव्य भरपूर मिळे, कांहींना नाममात्र मिळे. एका दौऱ्याचे अखेरीस मोरोबांना रोख पैसे द्यायला मिळाले नाहीत म्हणून सोन्यांत गाठवलेली रुद्राक्षाची माळच मिळाली होती. भाऊराव प्रापंचिक होते व घरीं वृद्ध मातापितरें, दोन भाऊ, दोन बहिणी, व अप्पाराव व भाऊरावांचें कुटुंब. अशा परिवाराला अप्पारावांच्या पगाराने कसें भागेल? म्हणून भाऊरावांची कुरकुर चाललीच होती. बाळकोबाही असंतोषी होते. तेव्हा हा अनागोंदी कारभार जाऊन कंपनीला कायम स्वरूप व स्थैर्य

आणण्यासाठी व्यवस्था करायचें ठरलें. पनवेलचे प्रसिद्ध सावकार विठोबा खंडाप्पा गुळवे यांनी अण्णासाहेबांना पनवेलीस बोलावून त्यांची पैशासह सर्व व्यवस्था करण्याचें ठरवून पनवेलीस आणलें.

पनवेलीस आल्यावर मधून मधून प्रयोग होत असत. अण्णासाहेबांनी 'रामराज्यवियोग' लिहावयास घेतलें. रोज जेवणें चाललीं होतीं व तन्नी ह्या पत्त्याचा डाव चाले. अण्णासाहेब 'रामराज्यवियोग' लिहीत होते. त्यांचें सारें लिखाण बहुतकरून रात्रीं शांत वेळीं चाले. एरवी दिवसभर "तन्नी" अगर इतर आळशी व्यवहार. त्या वेळीं कंपनींत मार्तंड महाजन म्हणून एक मुलगा होता. त्याला "तन्नी" खेळायचा कंटाळा; म्हणून अण्णासाहेबांनी एक दिवस त्याला डाळ तांदूळ मिसळून निवडायला सांगितलें. "तुला खेळायचा कंटाळा आहे तर तुला काम देतों" असें म्हटलें. हा कार्यक्रम पाहून विठोबा अप्पा गुळवे हे अण्णासाहेबांना म्हणाले. "अण्णा, हा कार्यक्रम पाहून तुमचें नवीन नाटक मागे पडलें वाटतें." असें त्यांनी म्हणतांच अण्णासाहेबांनी त्याच रात्रीं गुळवे यांना बोलावून व कंपनींतील मंडळींना बोलावून 'रामराज्यवियोगा'चे तीन अंक वाचून दाखविले. नंतर ते गुळवे यांस म्हणाले, "मी नुस्ते पत्ते खेळत नव्हतों. कैकयीच्या भूमिकेला योग्य असा मुलगा नाही म्हणुन अडलों आहे." बडोद्यास भास्कर बखले नांवाचा एक मुलगा आहे अशी बातमी लागल्यावर त्याला आणायच्या कामगिरीवर भाऊरावांना पाठवायचें ठरून भाऊराव बडोद्यास गेले.

बडोद्यास जाऊन भाऊरावांनी भास्कर यास गाठून कंपनींत येण्याबद्दल त्याचें मन वळविलें. भाऊरावांचा लौकिक चोहोंकडे पसरलेलाच होता. भाऊरावांच्या बोलण्याची छाप भास्करावर बसली व भाऊरावांप्रमाणे आपणही नांव मिळवूं अशी ईर्षा त्याच्या मनांत उत्पन्न झाली असावी. घरच्या प्रतिकूलतेमुळे राजरोस कंपनींत जाणें जमणार नाहीं म्हणून पलायनाच्या मार्गाचा अवलंब करण्याचें ठरलें. भाऊरावांनी भास्करला बडोद्याहून पळवून आणलें, व मुंबईहून पनवेलीस रवाना केलें. मुंबईस एका पौराणिक नाटक कंपनींत गोविंदराव निपाणीकर [ स्टेज मॅनेजर ] भास्करला एक रात्र घेऊन गेले. दुसरे दिवशीं पनवेलला सकाळीं जायचें होतें. तेवढ्या रात्रींत भास्करला

त्या नाटक कंपनींतील लोकांनी फितवायचा प्रयत्न केला. भास्कर निपाणीकरांना म्हणाला मी परत जातों. निपाणीकरांनीं त्याला निरनिराळीं प्रलोभनें दाखविलीं. कोट पाटलूण हा त्या वेळीं मोठा उंची व प्रतिष्ठित पोषाख समजला जात असे. म्हणून त्यांनीं भास्करला शेवटीं, आमीष दाखविलें तें विलक्षण होतें. ते भास्करला म्हणाले तुला आतां पितळेचा कोट पाटलूण पनवेलीस गेल्यावर करून देऊं. लहान वयामुळे भास्करची समजूत पटली.

पनवेलीस भास्कर आल्यावर भास्करची गाण्याची तयारी पाहण्यासाठी गावयास बसविलें. भास्करने "नमामि महिषासुरमर्दिनी" हें पद सुस्वर आवाजांत म्हणून मंडळींना करून गारेगार टाकलें.

रामराज्यवियोगाच्या तालमीला सुरुवात झाली. नाट्यशिक्षणासाठी अण्णासाहेबांनी आपले शिष्य गोविंद बल्लाळ देवल यांना बोलावून घेतलें. रामराज्यवियोगांतील पात्ररचना अशी होतीः सूत्रधार व दशरथ–अण्णासाहेब; नटी व मंथरा;–भाऊराव; वसिष्ठ-मोरोबा वाघोलीकर; कैकयी-भास्कर बखले.

रामराज्यवियोगाचे कांही प्रयोग झाल्यावर कल्याण येथें सौभद्र व शाकुंतलचे प्रयोग झाले. एका सौभद्र नाटकाला बाळकोबा नाटेकर आले नाहीत. म्हणून अपरिहार्य म्हणून मोरोबांनी अर्जुन व कृष्ण या दोन्ही भूमिका केल्या व अर्जुन व कृष्ण फक्त पांचव्या अंकांत शेवटीं एके ठिकाणीं अगदी थोडा वेळ येतात; तेवढ्यापुरतें नवीन नेमलेले सेक्रेटरी त्र्यंबकराव साठे यांना कृष्ण केलें. साठे रामराज्यवियोगांत सुमंताची भूमिका करूं लागलेलेच होते. शाकुंतल प्रयोगांत अण्णासाहेबांनी, बाळकोबा नाहीत म्हणून कण्वाची भूमिका केली. बाळकोबा गात असलेलीं कण्वाचीं पदें गायकीचीं आहेत, तीं म्हणणें साधणार नाही, म्हणून स्वतःला म्हणतां येतील अशा चालीवर कण्वाचीं नवीन पदें करून भूमिका केली. ती भूमिका पाहिलेल्या कंपनीच्या जुन्या भाऊराव आदिकरून मंडळीच्या तोंडून असें वर्णन ऐकलें की गायकी नसली तरी कण्वाचीं पदें अण्णासाहेबांनी इतकीं रसभरीत म्हटलीं की त्याला तोड नाही. रंगभूमीवर जायचे वेळीं कण्व स्नान केलेला पाहिजे म्हणून

डोकीच्या जटाभारावर पाणी ओतून घेऊन पाणी जटेंतून टिपकत असतां त्यांनी रंगभूमीवर प्रवेश केला.

त्यानंतर बाहेरगांवी दोन चार ठिकाणीं जाऊन १८८५ च्या भाद्रपदाच्या सुमारास पुण्यास प्रयोग सुरू केले. त्या वेळीं अण्णासाहेबांची प्रकृति खालावूं लागली होती. पुण्यास आल्यावर कै. डॉ. गणेश कष्ण गर्दे [ हे अण्णासाहेबांचे आतेभाऊ ] यांनी प्रकृति तपासून, अण्णासाहेबांना मधुमेहाचा विकार झाला आहे व त्यांनी पथ्याने राहिले पाहिजे असें सांगितलें. परंतु अण्णासाहेबांची मनोवृत्ती बेफिकीरीची असल्यामुळे त्यांनी दुर्लक्ष केलें.

पुण्यास शेवटीं झालेल्या रामराज्यवियोगांत अण्णासाहेबांना लहर आली की शंकरराव मुजुमदारांनी कैकयीची भूमिका पदें गाळून करावी. त्याप्रमाणे प्रयोग झाला. नंतर अण्णासाहेबांनी विश्रांतीसाठी गुर्लहोसूर येथे आपल्या घरीं जाण्याचें ठरवून निघण्याचा दिवस मुक्रर केला तो भाद्रपद व॥ ३०. इतर मंडळींनीं, अमावस्येस निघूं नये, असा पुष्कळ मोडता घातला. परंतु कुणाचें न ऐकतां त्याच दिवशीं निघून गेले. गुर्लहोसूर येथे गेल्यावर प्रकृतीची चढउतार चालूच होती. पथ्य करायचेंच नाही, हें ठरलेलेंच होतें. एक दिवस जवळच्या सौंदत्तीच्या डोंगरावर यल्लमादेवीचे दर्शनास जाण्याची इच्छा होऊन तसे दर्शनास जाऊन आले. त्यांच्या वडिलांनी त्यांना सांगितलें, " अण्णा, तूं नाटकें रचलीस, प्रयोग करून तुझा लौकिक चोहोकडे पसरला, तर मला नाटकें ऐकीव." अण्णासाहेबांना क्षीणता आल्याने त्यांनी वडिलांना सांगितलें, " तात्या, भाऊला बोलावून घेऊन त्याच्या तोंडून नाटकें ऐकवितों. भाऊचे सुस्वर गळ्यानीं गायलेलीं पदें ऐकून तुम्हांला आनंद होईल."

यानंतर प्रकृति ढासळतच गेली. त्यांत एक दिवस वाताचा झटका आला, व कपडे वगैरे फेकून देऊन कृष्णाप्पा (आचारी) यास म्हणाले, "रेशीमकाठी धोतरजोडी होती ती कावेंत रंगवून आण व विशा न्हाव्याला म्हणावें धोकटी घेऊन गंगेवर (मलाप्रभा) चल." नंतर थोडे वेळाने शांत झाल्यावर सर्व मंडळी जिथल्या तिथे आहेत असें पाहून म्हणाले, "तुम्ही

मला संन्यास घेऊं देत नाही, तर मीच घेतों." असें म्हणून जवळ अत्तर होतें तें डोक्यावर ओतून घेऊन "नारायण" म्हणून डोक्यावर पाण्याचा खुजा ओतून घेतला. मग पुन्हा गुंगींत पडले. डॉक्टर वगैरे आणले परंतु कांहीं उपयोग न होतां सन १८८५ ता. २ नोव्हेंबर, आश्विन वद्य ११ शके १८०७ रोजीं हा आधुनिक भरताचार्य श्री शंकरचरणीं विलीन झाला.

अण्णासाहेबांचें और्ध्वदेहिक पूर्ण झाल्यावर, कृष्णाप्पा, बाळू घोरपडे, विरू न्हावी, वगैरे मंडळी पुण्यास आली. त्या अगोदर त्या वेळचे सेक्रेटरी त्र्यंबकराव साठे यांनी एक गादी तयार करून अण्णासाहेबांचें छायाचित्र त्या गादीवर मांडून ठेवलें होतें. मोरोबा, भाऊराव वगैरे सर्व मंडळी हताश होऊन बसली. आता पुढें काय करायचें याचा विचार होऊन, संस्था बंद करण्यांत कोणताच फायदा नाही, तरी उत्साहाने आपण पुढे धंदा करूं, असें ठरवून चालक मोरोबा व भाऊरावांनी पुण्यास तीन प्रयोग, अनुक्रमें, शाकुंतल, सौभद्र व रामराज्यवियोग केले. त्या प्रयोगास अण्णासाहेबांचे वडील पांडुरंगराव तात्या किर्लोस्कर यांना बोलावून आणून या तीन प्रयोगांचें उत्पन्न पूज्यभावाने त्यांना दिलें.

अण्णासाहेब द्रव्यार्जनाच्या बाबतींत अगदी विरागी होते. पनवेलीस कंपनीची घटना ठरून त्यांत भागीदार कुणाकुणाला करायचें याबद्दल विठोबा खंडाप्पा गुळवे यांच्या समक्ष चर्चा चालू असतां, अण्णासाहेबांनी स्वतः-साठी एक रुपायांत, फक्त एक आणा भागी ठेवा असें सांगितलें होतें. परंतु एवढी संस्था उभी करून ज्यांनी संगीत नाटकाचें जें एक नवीन क्षेत्र नटांसाठी व नाट्यकलेच्या उत्कर्षासाठी निर्माण केलें, त्यांना एवढीशी वाटणी बरी नव्हे असें ठरून नंतर भागीदारी ठरली.

नाशिक येथे असतांना एका सौभद्र प्रयोगास त्या वेळीं पंचवटींत व तपोवनांत असलेल्या सर्व संन्याशांना अण्णासाहेबांनी सन्मानपूर्वक बोलावलें होतें. प्रयोग पाहून सर्व संन्यासी आनंदित झाले. त्यांतील एक विद्वान संन्यासी कृष्णानंद सरस्वती यांनी अण्णासाहेबांस "रसमूर्ति अभिनव कालिदास" व मोरोबा, भाऊराव यांस 'प्रकृतरसपोषक' 'संगीतकुशल' अशा पदव्या दिल्या. या सर्व संन्याशांना पुडी करण्याचें

ठरवून नाशिकच्या तपोवनांत मांडव घालून भोजनाचा उत्कृष्ट बेत केला. सायंकाळीं पुढीचा समारंभ आटपल्यावर गावांत येतांना अंधार पडला. म्हणून एकदोन धोतरें फाडून व टेंबे (हिलाल) करून तेलाऐवजी तुपांत बुडवून त्या उजेडांत मंडळी नाशिक गांवात आली.

अण्णासाहेबांना कीर्तन करायची इच्छा होती व मागे साथीला मोरोबा व 'भाऊरावांना घेऊन कीर्तन करणार,' असें बोलून दाखवीत असत.

मराठी ग्रंथ

# २ : गोविंद बल्लाळ देवल

देवलांचा जन्म शके १७७६ कार्तिक शु. ४ रोजीं (ता. १३ नोव्हेंबर १८५५), सांगलीजवळ हरिपूर या गावीं झाला. त्यांचे वडिलांना श्रीमंत बुधगावकरांच्या (मिरज जूनियर) सरकारी कुरणावर दरमहा तीन रुपये पगार मिळत असे व एक गायही बाळगण्यासाठी दिली होती. इतकी कमी मिळकत असूनसुद्धा ते प्रतिष्ठेने राहत असत. त्यांना गोविंदरावांसह तीन मुलगे होते. थोरले कृष्णाजी बल्लाळ देवल, दुसरे रामचंद्रपंत उर्फ राजाभाऊ व धाकटे गोविंदराव. तिघेही मुलगे कृष्णाकाठच्या सुंदर हवेमुळें उत्तम निरोगी होते. त्यांत राजाभाऊ, व गोविंदराव तालमीचे नादी व उत्तम पोहणारे होते. गोविंदरावांचें प्राथमिक शिक्षण हरिपुरांतच झालें. गोविंदराव दहा वर्षांचे असतांनाच वडील व मातुश्री निवर्तलीं. थोरले बंधु कृष्णाजीपंतांना सरकारी नोकरी लागल्यानंतर गोविंदराव बेळगावास सरदार्स हायस्कूलमध्ये शिकूं लागले. या सदरार्स हायस्कूलमध्ये अण्णासाहेब किर्लोस्कर शिक्षक होते. अण्णासाहेब कवि म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्याबद्दल गोविंदरावांना पूज्य बुद्धि उत्पन्न झाली. अण्णा कविता करतात तशा आपल्यालाही करतां याव्या अशी गोविंदरावांच्या मनांत इच्छा होऊन त्यांनी एक कविता केली. ती घेऊन, बरोबर दोन सोबती घेऊन, अण्णासाहेबांकडे गेले. बरोबरच्या सोबत्याने अण्णासाहेबांना सांगितलें, "मास्तर, गोविंदाने एक कविता करून तुम्हांला दाखवायला आणली आहे." त्यावर अण्णासाहेब म्हणाले, "काय? गोंद्याने कविता केली आहे? काय रे, खरंच तूं स्वतः केली आहेस, कां कुणाकडून करून घेतली आहेस?" त्यावर गोविंदरावांनी आपण स्वतः केली आहे असें सांगितलें. त्या कवितेचा शेवटचा चरण लक्षांत राहिलेला गु. गोविंदरावांनी लेखकाला म्हणून दाखविला होता तो असा : "गोबदे करितसे स्तुति साची" कवीचें नांव कवितेंत शेवटीं घालण्याची वहिवाट होती. त्याला अनुसरून

त्यांनी " गो. ब. दे. हें संक्षिप्त नांव सदर कवितेंत घातलें होतें. गोविंदरावांची कवित्वशक्ति, अजमावण्याकरिता अण्णांनी गोविंदरावांना एका विषयावर कविता करायला सांगितली. ती गोविंदरावांनी ताबडतोब करून दाखविली. त्यावर अण्णासाहेबांनी गोविंदरावांना शाबासकी दिली व कविता करायला फार प्रोत्साहन दिलें.

बेळगावाहून देवल हे, वडील बंधूंची बदली झाल्यावर, कोल्हापुरास राजाराम हायस्कूलमध्ये आले. तेथेंच मॅट्रिक परीक्षा १८७५ सालच्या सुमारास पास झाले. इतर महाराष्ट्रीय कवींप्रमाणे गोविंदरावही पौराणिक कथांवर नाटक मंडळ्यांना आख्यानें करून देत असत. त्यांत भारतीय युद्धांतील भीम-दुर्योधनांचे गदायुद्धप्रसंगीचें एक पद मला मिळालें. गोविंदरावांचे आर्योद्धारक मंडळींतील एक सहकारी वामन श्रीधर भावे हे पुढे पुष्कळ वर्षें पुण्यास असत. लेखकाचा त्यांच्याशीं पुष्कळ घरोबा होता. ते लेखकाला किर्लोस्कर मंडळींत जायला प्रोत्साहन देणारेही होते. त्यांच्याकडून लेखकाला हें पद मिळालें; तें असें—

पंडुनंदन रदन करकर चावुनी मग गदा कर।
वदे कुरुकुलवन्हि बलवर। गदा धरिं तव अंकिं नीचा ॥ १ ॥

षंढदतिलसमपंडुनंदन, अंधतनया तुझें भाषण
स्मरण त्याचें जाहल्या मन। क्रोधवश बहु राहिलेंसे ॥ २ ॥

पूर्वकृत तव पापशमना समरतीर्थी करी गमना ॥
बालसुत मग वरे कवना। उभें बलधन राहिलेंसे ॥ ३ ॥

याप्रमाणे मुलींना, मंगळागौर, हरतालिका, वगैरे प्रसंगीं म्हणण्यासारख्या कविताही करून देत असत. त्या वेळीं त्यांचें " सासुरवाशीण " हें गाणें बरेंच प्रसिद्धि पावलें होतें, तें असें— "

## सासुरवाशीण

फारा दिवशीं गंगु भेटली यसूस ।
हितगुज विचारी कां ग बाळलीस ? ।
गळां मिठि घालि गंगु जाऊन प्रीतीनं ।
वाटे मैत्रिणीपुढे जगीं सर्व ऊणं ।
ऐक बाइ माझ्या जन्माची कहाणी ।
काय करूं खळेना डोळ्याचं ग पाणी ।
सकाळीं उठुनी करतें सडा सारवण ।
उपकरणीं मी धूतें रांगोळि घालून ।
कडेवरी घेऊनी अजस्र घागर ।
करितें खेपा पाण्याच्या मोजून शंभर ।
अंग, मोट धुवुनी फिरतें मी माघारी ।
कडे घागर हातिं तांब्या धुणीं शिरावरी ।
पाय पोळती मज वाट चालवेना ।
जीव उपाशी दया कोणास येईना ।
इतुकें करितां जाते दुपार टळून ।
ताक तुकडे पुढे टेवितो आणून ।
उष्टीं खरकटीं करतानं बेजार ।
घागर अवदसा फिरुन चढे कडेवर ।
संध्ये बिंध्येसी मांडून पोराशीं ।
गिळूं घालितें निजवितें सगळ्याशीं ।
हळूं बोलतां येती सगळी ग कावून ।
गाल तोडिती जरा बोलतां मोठ्यानं ।
थोडं बोलतां म्हणती शिवलं कां तोंड ।
जरा बोलतां म्हणती काय दांडगी ही रांड ।
इतकं होता जाते मध्यान्ह उलटून ।
नाही झोप पडतें तशीच जाऊन ।
घरीं तरि सदा दुखण्यानं हैराण ।

मात्रा घाशितां झिजले हात सहाण ।
किती दुःख सोसूं किति रडूं यमूताई ।
कर्म पाठीशीं लागलं खरं बाई ।
देवा गोविंदा झडकरि येई बा, धावून ।
धेनु वरती काढावी पंकांतून ।

शाळेंत जडलेला गुरुशिष्यसंबंध देवलांनीं आमरण पाळला. त्यांच्या नाट्याच्या आरंभीच्या पदांत गुरु बलवंताला अभिवादन केलेलें आहे. अण्णासाहेब निधन पावल्यावर देवलांनी एक आर्या केली होती.

बलवत्कविकवितामधु मधुपासम रसिक रसिक जे प्याले ।
वदतील माधुरी ती ससित पयाचे न देति शत प्याले ।

सन १८९९–१९०० सालीं किर्लोस्कर मंडळी श्री. शिंदे सरकारांच्या निमंत्रणावरून ग्वाल्हेर येथे गेली असतां महाराजांच्या सन्मानार्थ देवलांनीं पद करून नाटक मंडळीस म्हणण्यास दिलें होतें तें असें —

चाल (वैशाखमासिं वासंतिक)

हें मागतसों दान अम्ही त्या उमाधवा ।
सांभाळी राजपदीं सतत माधवा ॥ ध्रु. ॥
श्री शंकरपदभक्ती पुरी बाणली असे ।
निजपूर्वजकृतिकीर्ति मनीं वागवीतसे ।
बलतेजोगुण विभवादिकें वाण ती नसे ।
परि अंकीं खेळाया एक सुत हवा ॥ १ ॥

सन १९०४ सालीं मिरजेस कि. सं. मंडळी असतां श्री. शाहू महाराजांनी किर्लोस्कर मंडळींतील कांही मंडळींना व देवलांना बोलावलें होतें. त्या वेळीं महाराजांवर केलेलें पद :

(चाल-- घेई मम वचन हें)

हेची तुज मागतों सकल भुवनेश्वरी ।
वरदकर छत्र धरि छत्रपति शाहुवरी ॥ ध्रु ॥
विप्रगोपालभूप शिवतत्पदा
देवि करि पात्र हा छात्रकुलकेसरी ॥ १ ॥
नृपतिनाथा अशा उचित जी जी जगीं ।
विभवसुखसंपदा वर्षि याच्या शिरीं ॥ २ ॥

तिसरा चरण होता तो आठवत नाही.

मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी बेळगांव येथे सरदार्स हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी धरली. परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांचें व त्यांचें न . पटल्यामुळे त्यांनी नोकरी सोडली. खर्चाच्या दृष्टीने कॉलेजखर्च पुरा होणें अशक्य वाटल्याने, त्यांनी तो नाद सोडला. या वेळीं बक्षिसासाठी नाटकें मागविलीं होतीं. परिक्षक कमेटीपुढे दोनच नाटकें आलीं होतीं. एक वासुदेवशास्त्री खरे यांचें " गुणोत्कर्ष " व दुसरें देवलांचें " दुर्गा " नाटक. कमेटीने दुर्गा नाटक निवडलें. पण, कमेटीचा निर्णय प्रसिद्ध होण्यापूर्वीच कुणीतरी तो वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केला. त्यामुळे कमेटीला आपला निर्णय बदलावा लागला व बक्षिस " गुणोत्कर्ष " नाटकाला मिळालें. दुर्गा नाटकाला जरी बक्षीस मिळालें नाही तरी मागाहून खास बक्षीस ८० रु. चें दुर्गा नाटकास मिळालें.

पुढे देवल पुण्यास आले व त्यांनी शेतकी कॉलेजमध्ये प्रवेश करून तेथे डिप्लोमाही मिळविला. त्या वेळीं प्रसिद्ध गणिती केरूनाना छत्रे यांचेकडे गणिताचा अभ्यास करायला जात. पुढे त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी धरली.

पुण्यास आर्योद्धारक म्हणून एक नाट्यक्लब स्थापन झाला. त्यांनी प्रथम परशुरामतात्या गोडबोले यांच्या ' वेणीसंहार ' या गद्य भाषांतराचा प्रयोग केला. त्यांत देवलांनी अश्वत्थाम्याची भूमिका फार उत्तम केली होती, असें त्यांचे सहकारी वामनराव भावे यांनी सांगितलें. पुढे आर्योद्धारकने महादेवशास्त्री कोल्हटकरांचें इंग्रजीचें भाषांतर " अथेल्लो " या नाटकाचा

प्रयोग बसविण्यास सुरुवात केली. परंतु त्या भाषांतराची भाषा नाट्यप्रयोगाला जुळती नसल्याने, देवलांनी रंगावृत्ति तयार करुन, प्रयोग केले. हल्ली जें " झुंझारराव " पुस्तक आहे, तीच वर लिहिलेली रंगावृत्ती. नंतर अण्णासाहेबांनी, भाऊराव कोल्हटकरांना अभिनयशिक्षण देण्यासाठी देवलांस बोलावून घेतलें. त्याच वेळीं देवलांना शाकुन्तलमधील शकुन्तलेचीं पदें करण्यासाठी सांगितलें व गुरुच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी तीं केलीं. बाहेर हें कळेपर्यंत हीं पद्यें अण्णासाहेबांचीं नव्हेत असें कुणालाही वाटलें नाही. इतकीं तीं बेमालूमपणें त्यांत सामावलीं गेलीं. पुढे पुण्यास देवल राहत असतांना प्रपंचासाठी त्यांनी खासगी शिकवण्या केल्या. त्यांची एक शिकवणी हरि रावजी चिपळूणकर यांचेकडे होती. सरदार्स हायस्कूल, न्यू इंग्लिश स्कूल, यांमध्ये शिक्षकाची नोकरी केल्यामुळे त्यांना ' देवलमास्तर ' हें नांव पडलें, तेंच पुढे किर्लोस्कर मंडळींत रुढ झालें.

कोल्हापुरचे दिवाण बर्वे यांनी टिळक आगरकर यांच्यावर केलेल्या फिर्यादीचे खर्चासाठी कै. अण्णासाहेब किर्लोस्करांनी ' शाकुंतल ' नाटकाचा प्रयोग मदतीदाखल केला होता. आयत्या वेळीं किर्लोस्करमधील मंडळी जमवून तो प्रयोग करण्याचें ठरलें. अनवधानाने गौतमी या पात्राची आठवणच राहिली नाही. प्रयोगाचे वेळीं कै. अण्णासाहेबांनी देवलांना ती भूमिका करायला सांगितली. तेव्हा देवलांनी मिशा झाकण्यासाठी तोंडावर पदर घेऊन भूमिका केली. १८८५ सालीं अण्णासाहेब वारल्यानंतर कांही काळ देवलांचा आणि किर्लोस्कर मंडळीचा संबंध तुटला होता. तो पुढे १८८८-८९ सालच्या सुमारास देवलांचें ' विक्रमोर्वशीय ' नाटक किर्लोस्कर मंडळीने बसविलें तेव्हा चालू झाला.

१८८६ च्या सुमारास देवल पुण्यास राहिले व त्याच्याच आगेमागे, १८८५ सालीं पुण्यास कांही नाट्यप्रेमी प्रतिष्ठित व धनिक मंडळीच्या प्रोत्साहनाने व मदतीने " ललितकलोत्सव नाटक मंडळी " सुरू झाली होती. त्या कंपनीने आपलें पहिलं नाटक म्हणून श्री. गाडगीळ या नांवाच्या गृहस्थांनी कालिदासाचें भाषांतर केलेलें ' विक्रमोर्वशीय ' हें नाटक बसविलें होतें. त्या नाटकाच्या तालमीला कै. अण्णासाहेब किर्लोस्कर मंडळीच्या

बोलावण्यावरून गेले होते, असें गोविंदराव सोरटे यांनी मला सांगितलें. सोरटे त्या वेळीं ललितकलोत्सव मंडळींतच होते.

पुण्यास राहून देवलांनी व श्रीनिवास भिकाजी सरदेसाई यांनी रेनाल्ड्सच्या "मिस्टरीज ऑफ लंडन" चें भाषांतर, "कादंबरी कलाप" हें मासिक सुरू करून, त्यांत छापायला सुरुवात केली. पुढे कादंबरी कलाप बंद होऊन तेंच भाषांतर शंकरराव मुजुमदार यांनी पुरें केलें व छापून प्रसिद्ध केलें. पुणेवैभव या वर्तमानपत्रांतही देवल लिहीत असत.

ललितकलोत्सव मंडळीचें विक्रमोर्वशीय विशेष गाजलें नाही. म्हणून देवलांना बोलावून त्या मंडळींनी "मृच्छकटिक" (शूद्रकाचें) भाषांतर करवून बसवायला घेतलें. मृच्छकटिक भाषांतरासाठी देवलांना परशुरामतात्या गोडबोले यांच्या भाषांतराचा उपयोग झाला. हें देवलांनी मृच्छकटिकच्या प्रस्तावनेंत नमूदही केलें आहे. त्या प्रयोगांत पुढील माणसांनी भूमिका केल्या होत्याः

चारुदत्त--राजाभाऊ वेरुळकर
मैत्रेय -- बाबूराव कोतकर
शकार — शिवरामपंत जोशी
शकाराचा विट --- केशवराव बडोदेकर
शर्विलक -- श्रीपतराव फडके (देवलांचे शालक)
वसंतसेना -- बापूराव पेठे
मदनिका -- गोविंदराव सोरटे (आर्टिस्ट); (हे पुढे किर्लोस्कर मंडळींत गेले व तेथे सौभद्रांत रुक्मिणीची भूमिका करून प्रसिद्धि पावले)

येणेप्रमाणे पात्रें प्रथम प्रयोगास होतीं.

पुढे याही कंपनीची फाटाफूट झाल्यावर देवलांचा किर्लोस्कर मंडळीशीं पुन्हा विक्रमोर्वशीय नाटकाने संबध सुरू झाला. बाणभट्टाच्या 'कादंबरीवर,' होळकर सरकारांनी बक्षीस जाहीर करून नाटक मागविलें. त्या बक्षिसासाठी देवलांनी शापसंभ्रम नाटक लिहिलें. पूर्वसंबंधाने तें त्यांनी किर्लोस्कर संगीत मंडळीच दिलें. पुढे १८९५ सालीं 'मृच्छकटिक' दिलें व त्यानंतर १८९९ सालीं 'शारदा' नाटक दिलें.

विक्रमोर्वशीय नाटकांतील प्रथमप्रयोगांतील पात्रयोजना :
पुरूरवा — मोरोबा वाघोलीकर
चित्ररथ गंधर्व व नारद — बाळकोबा नाटेकर
विदूषक — काशीनाथपंत परचुरे
ऊर्वशी — भाऊराव कोल्हटकर
राणी — गोविंदराव सोरटे
चित्रलेखा — व्यंकटराव भडसावळे (पनवेलकर)
प्रथम प्रयोग पंढरपुरास झाला.

× × ×

'शापसंभ्रम': प्रथम प्रयोगांतील पात्ररचनाः
पुंडरीक — भाऊराव कोल्हटकर
कपिंजल — नारायणराव दडपे
चंद्रापीड — केशवराव बडोदेकर
महाश्वेता — चिंतोबा दिवेकर (गुरव)
कादंबरी — कृष्णराव गोरे
तरलिका — दत्तोबा लाड्ड (दादा लाड्ड)
प्रथम तीन अंकांचा प्रयोग १८९३ सालीं पुण्यास झाला.

× × ×

'मृच्छकटिक' मधील आरंभीची पात्ररचनाः
चारुदत्त — भाऊराव कोल्हटकर
मैत्रेय — काशीनाथपंत परचुरे
शकार — केशवराव बडोदेकर
शर्विलक — नारायणराव दडपे
शकाराचा विट — चिंतोबा गुरव
चेट — नारायणराव दडपे
संवाहक — नारायणबुवा मिरजकर
वसंतसेना — कृष्णराव गोरे
मदनिका — शंकर नारायण (तात्या) कड्डू (पुरोहीत)

रोहसेन — बाबूराव गाडे

प्रथम प्रयोग १८९५ सालीं कोल्हापुरास झाला.

× × ×

'शारदा' नाटकांतील पात्ररचना:

कोदंड — भाऊराव कोल्हटकर.

हिरण्यगर्भ — चिंतोबा दिवेकर.

भुजंगनाथ (श्रीमंत) — नारायणबुवा मिरजकर.

भद्रेश्वर — काशीनाथपंत परचुरे.

सुवर्णशास्त्री — रामभाऊ किंजवडेकर.

जयंत — गणपत पुरोहीत.

शारदा — रामभाऊ डवरी.

इंदिरा — कृष्णराव गोरे.

कांचनभट — नारायण दडपे.

गोरख (शंकराचार्य) — गणू बोडस

वल्लरी — कृष्णा दिवेकर.

जान्हवी — बाबू गाडे.

प्रथम तीन अंकांचा प्रयोग इंदूर येथे १८९९ जानेवारींत झाला.

इंदूर येथे तीन अंकांचा प्रयोग झाल्यानंतर भुसावळ, एरंडोल वगैरे मुक्काम झाले. त्या गावींही तालमी सुरूच होत्या. अहमदनगरला चवथ्या अंकाची तालीम सुरू असतांना, एके दिवशीं देवल, कृष्णराव गोरे यांस तालीम देत होते. ते गोऱ्यांना सांगत होते, "एखाद्या आईवर तिच्या मुलीचें लग्न मोडण्याचा प्रसंग गुदरला तर ती आई आपल्या मुलीचें सांत्वन कसें करील हें तुझ्या कल्पनेने मनांत आणून तसा अभिनय कर." त्यावर गोरे यांनी मला जमत नाही असें सांगितलें. देवल मास्तरांनी म्हटलें, "तुझी कल्पना कितपत चालते तें मला दाखीव; कमी पडेल तें मी शिकवीन." परंतु गोरे यांनी, मला जमणार नाही, हा एकच मंत्र जपायला सुरुवात केली. अखेर चिडीवर प्रकरण जाऊन देवलमास्तरांनी तालीम बंद केली व ते सायंकाळीं

हरिपूरला निघून गेले. पुढे थोडे दिवसांत अहमदनगरला चार अंकीं प्रयोग करून मंडळी सोलापुरास गेली. तीन अंकांचा प्रथम प्रयोग केला, त्या दिवशीं कोरसासाठी तात्पुरतें म्हणून देवलमास्तरांनी एक पद्य केलें होतें; तें असें–

पद

**धावा दानवकुलशमना । स्वजनकुंजवनकुंजरमददमना ॥ ध्रु० ॥**
**दंभाज्ञानालसादि असुरीं । प्रलय मांडिला आर्यागारीं।**
**आर्या बा ती कष्टी भारी । कंठ मोकली करि करुण रवा ॥ १ ॥**

मुंबईच्या प्रथम पांच अंकीं प्रयोगापर्यंत हेंच कोरस म्हटलें जात होतें.

सोलापुरास पांचवा अंक भाऊराव, रामभाऊ यांनी तालमी घेऊन बसवून पांच अंकीं एक शेवटचा प्रयोग करून कंपनी मुंबईस रवाना झाली. देवल-मास्तर नगरहून रागावून गेले होते, त्यांची समजूत करून त्यांना मुंबईस आणलें. पुस्तक छापून प्रसिद्ध होईपर्यंत मुंबईचा पहिला प्रयोग तीन अंकीं झाला; पुस्तकें छापून आल्यानंतर पांच अंकीं प्रयोग झाला. या शारदा नाटकाच्या प्रयोगाच्या सामान्य हक्कापोटीं एक हजार रुपये व तालीम देण्या-बद्दल पांचशे रुपये देवलांना देण्यांत आले. शारदा नाटक इतकें यशस्वी झालें की मराठी जाणणाऱ्या मुंबईतील जनतेच्या तोंडीं शारदा नाटक, त्यांतील श्रीमंत, भद्रेश्वर, इत्यादि पात्रें व पद्यें सर्वतोमुखीं झाली.

यानंतर किर्लोस्कर मंडळी श्री शिंदे सरकारांच्या खास निमंत्रणावरून ग्वाल्हेर येथे गेली. बरोबर देवल मास्तर होते. ग्वाल्हेरहून देवलमास्तर १८९९ डिसेंबर मध्ये लखनौ कॉंग्रेससाठी गेले.

भाऊराव आजारी झाल्यानंतर, जोगळेकर हे नवीन गृहस्थ नायकाच्या भूमिकेकरिता नियोजित करून, भाऊरावांनी देवलांना जोगळेकरांना नाट्यशिक्षण देणेसाठी बोलावलें. शारदा नाटकाची तालीम सुरू होऊन जोगळेकरांचें काम साधारण बसत आलें असतां, शंकरराव मुजुमदारांचा आग्रह पडला की, पहिलें शाकुंतल ता. ३१ आक्टोबरला झालें, त्याप्रमाणे आतांही जोगळेकर नायक होऊन पहिला प्रयोग ता. ३१ आक्टोबरला झाला पाहिजे. देवल्मास्तरांचें म्हणणें पडलें की, जोगळेकरांचें काम चांगलें बसलें नाही व नवीन मनुष्य शक्य तितक्या पूर्ण तयारीने रंगभूमीवर जावा. दोघेही हट्टी आणि

यावरच कडाक्याचा वादविवाद होऊन शेवटीं त्या वादामुळे विटून देवलमास्तर मिरजेहून हरिपुरास निघून गेले.

शारदा नाटक झाल्यावर देवल मास्तर "मदिरा" हें नाटक विराटपर्वांतील कीचकाच्या आख्यानावर लिहिणार होते. वहिवाटीप्रमाणे नांदीचें एक पदही केलें होतें. इतक्यांत 'चंद्रहार' व 'चंद्रसेना' नाटकाचे कर्ते पुरुषोत्तम भास्कर डोंगरे यांनी देवल मास्तरांना आदरभावानें पत्र लिहून कळवलें की, मी सौरंध्री नाटक लिहीत आहें, त्याला आशीर्वाद असावा. भाऊरावही दिवंगत झाल्याने "माझ्या दृष्टीसमोर भाऊरावासारखा नट नाही," यामुळे त्यांचा उत्साहभंग होऊन त्यांचें नाटक लिहिणें स्थगित झालें.

मागें लिहिल्याप्रमाणे देवलमास्तर निघुन गेल्यावर देवलांच्या नाट्यशिक्षणाची थोडी अभिरुचि घेतलेले जोगळेकर यांनीं देवलमास्तरांना गळ घालून ते १९०३ सालीं मास्तरांना मुंबईस घेऊन आले. मुंबईहून कंपनी बडोद्यास गेल्यावर देवलमास्तर १९०४ च्या जून महिन्यांत मिरजेस आले. ते कंपनीबरोबर कोल्हापुरासही आले. देवलमास्तर मिरजेस आलेवेळीं श्री शं. वि. कुलकर्णी यांचें सुमती नाटक बसविणेस शंकरराव मुजुमदारांनी शंकरराव पाटकर यांस आणलें होतें. साताऱ्याहून किर्लोस्कर मंडळी नोव्हेंबर १९०४ च्या सुरुवातीस मुंबईस गेली. मुंबईस देवलमास्तर आले. जुन्या नाटकांचें शिक्षण जोगळेकरांना सुरू होतेंच. कृष्णराव गोऱ्यांनी किर्लोस्कर मंडळींत बारा वर्षांचा काळ काढून मुंबईच्या मुक्कामांतच स्वदेशहितचिंतक नाटक मंडळींत प्रवेश केला. मुंबईचा मुक्काम संपल्यावर नायिकाविरहित किर्लोस्कर मंडळी, बेळगांव हुबळी, रबकवी, जमखिंडी वगैरे गावीं जाऊन मिरजेस आली. देवलमास्तर मिरजेस आले. कंपनीस सुट्टी झाली. सुट्टींत देवलमास्तर जोगळेकरांस शिक्षण देत मिरजेस कंपनींतच राहिले. या अवधींत नारायणराव (बालगंधर्व) यांचा श्री. छत्रपति शाहूमहाराजांच्या कृपेनें लाभ झाला. नारायणराव कंपनींत राहण्याचें ठरल्यावर नारायणरावाला शकुंतलेची भूमिका शिकवायला देवलमास्तरांनीं सुरुवात केली. परंतु नंतर एक वादळ उत्पन्न होऊन किर्लोस्कर मंडळीचा संबंध तुटला तो कायमचा. तें वादळ असें उत्पन्न झालें.

१९०५ सालीं बालगंधर्व किर्लोस्कर मंडळींत आले व देवलमास्तरांनी

अशी एक सूचना–फर्मान स्वरूपाची–मांडली कीं, किर्लोस्कर मंडळींतील सर्व व्यवहारांत शेवटचा निर्णायक शब्द आपला असला पाहिजे. या फर्मानानें खळबळ उडून आमच्या बाळगोपाळ मंडळींत व मोठ्या मंडळींत चर्चा सुरू झाली. नाटकप्रयोग, रंगभूमि, व नाटकपात्रें, यासंबंधी देवलांचा सर्वाधिकार, लहानमोठ्या सर्वांना–शंकरराव मुजुमदारा-खेरीज करून–मान्य होता. शंकररावांना देवलांची गरज कंपनीला आहे हें मनोमन पटलेलें असूनसुद्धा, देवलांचा सर्वाधिकार आपल्या अनिर्बंध कारभाराला जाचक होईल, म्हणून शंकरराव विरुद्ध होते. शेवटीं देवलांनी कंपनींतील नटांसमोर फर्मान ठेवून कौल मागितला. परंतु कंपनींतील नटांना हा पेचप्रसंग सोडवतां न आल्यामुळे देवल मास्तर कंपनीचा संबंध तोडून गेले व किर्लोस्कर कंपनी अखेरपर्यंत देवलांना मुकली.

पुढें १९१३ सालीं गंधर्व मंडळी निघाली व आम्हीं त्रिवर्ग भागीदारांनीं देवल मास्तरांना कंपनींत आणून बसविलें. त्यांच्या दोन अटी कबूल केल्या. एक नाटकप्रयोगासंबंधी त्यांचा शब्द अखेरचा समजला जाणें व दुसरी गुरुदक्षिणा म्हणून वर्षांतील सर्वांत ज्या प्रयोगाला उत्पन्न जास्त होईल त्यांतील प्रयोगाचा खर्च वजा जातां जी रक्कम राहील ती त्यांना द्यायची व ते कंपनी-बरोबर असतांना त्यांचा सर्व खर्च कंपनीनें सोसायचा. या अटी कंपनीकडून अखेरपर्यंत पाळल्या गेल्या.

१९१६ सालीं बडोद्याचे कलाप्रेमी महाराज श्री. सयाजीराव गायकवाड यांनी एका विनोदी नाटकाची इच्छा दर्शविली. देवल मास्तर लिहिण्याचें कबूल करीनात. तेव्हा त्यांचें 'फाल्गुनराव' नाटक माझ्या आवडीचें होतें. महाराजांचे खानगी कारभारी त्या वेळीं रावसाहेब शिरगावकर होते. त्यांना आम्हीं फाल्गुनरावांचें संगीतांत रूपांतर करण्याविषयीं महाराजांची इच्छा आहे म्हणून सांगा असें गुपचूप सांगितलें. तें फलद्रूप होऊन देवल पदें करण्यासाठी बडोद्यास आले. पदांच्या चाली देण्यांत येऊं लागल्या. बालगंधर्वांचे हितास जपणारे बाळासाहेब पंडीत यांनी गायकीच्या चिजांच्या चालीवर पद्यें करावी अशी सूचना केली. त्यावर देवल मास्तर म्हणाले की, "जी चाल रसाच्या दृष्टीने उत्तम वाटेल तीच चाल मी घेईन. पात्रांच्या मर्जीखातर

पदें करणारा नाटककार मी नाहीं; वाटेल त्या अवघड चालीवर पदें होतील. परंतु माझीं पदें मागे राहाणार तीं माझींच अशीं लोकांना वाटलीं पाहिजेत."

देवल मास्तर संतापी होते आणि संतापाच्या भरांत त्यांच्या मनांत येईल तो निर्णय घेत. परंतु राग ओसरल्यावर ते मग फार दुराग्रही राहत नसत. नोकरींत मानहानि सोसण्याचा प्रसंग अनुभवल्यामुळे १८८४ पासून अखेरपर्यंत त्यांनी स्वतंत्र जीवन अनुभवलें. आरंभीचीं कांहीं वर्षे पुण्यास शिकवण्या करून अत्यंत गरीबींत दिवस काढले. नंतर नाटकांच्या पुस्तकांच्या उत्पन्नावर त्यांचें बस्तान बसलें. एका 'शारदा' नाटकाने त्यांच्या हयातींत त्या नाटकाच्या प्रयोगाच्या हक्कापोटीं व पुस्तकांच्या आवृत्तीवर पंचवीस हजार रुपये मिळवले. सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजशेजारीं देवलमास्तरांनी जमीन घेऊन मळा केला. त्याला 'शारदा मळा' ही संज्ञा प्राप्त झाली होती.

१८९७ सालीं देवलांची पत्नी दिवंगत झाली; तिच्या अंगावरचे दागिने त्यांनी त्या वेळीं म्यु. सेक्रेटरी असलेले त्र्यंबकराव साठे ( किर्लोस्कर सं. मंडळीचे पहिले सेक्रेटरी ) यांच्या स्वाधीन केले होते. वेळोवेळीं साठे यांनी त्यांना त्यांची व्यवस्था करणेस सांगितलें होतें. परंतु ते तिकडे लक्षच देत नसत. शेवटीं देवलांनी ते दागिने मोडून आलेली तीन हजार रुपयांची रक्कम पुण्याच्या अनाथ बालिकाश्रमाला कुटुंबाच्या-राधाबाईच्या-नांवाने "गीता मंदिर" बांधण्यासाठी दिले.

त्यांच्या लहानपणाची एक गोष्ट कळली ती पुढें देत आहे. देवलांचें वडील दिवंगत झाल्यानंतर त्या तिघां बंधूंवर मोठा बिकट प्रसंग गुदरला. और्ध्वदेहिक उरकल्यावर हरिपुरांतील कांही लोभिष्ठ लोकांनी हळूहळू सांगायला सुरवात केली की, तुमच्या वडिलांच्या गरीबीमुळे आम्हीं त्यांना उसनवार पैसे दिले आहेत, ते आमचे आम्हांला देऊन टाकणें, पुत्रधर्म म्हणून तुमचें कर्तव्य आहे. या तिघां भावांना यांतील कांही माहीत नसल्यामुळे त्यांना धक्का बसला. भाऊ एकत्र बसून विचार करूं लागले. त्या वेळी गोविंदरावजी देवल सर्वांत लहान, त्यांनी आपल्या बालबुद्धीने

एक कल्पना सुचविली. ते म्हणाले, " वडिलांचें कर्ज घेतल्याबद्दलचें लिखाण कुणाजवळ नाही आणि वडिलांचें देणें रास्त असेल तें पुत्रधर्म म्हणून आम्हीं दिलेंच पाहिजे. तरी ज्यांचे पैसे आम्हीं देणें असतील, त्यांनी संगमनाथावरचें फूल उचलून द्यावें. म्हणजे आम्ही देणें असेल तें देऊं. परंतु फूल उचलून द्यायला कुणी तयार झाले नाहीत; त्यामुळे काल्पनिक कर्जाचें संकट टळलें.

देवलांचें नाट्यशिक्षण बिनतोड असे. मला नाट्यशिक्षण देवलांच्याशिवाय इतर तीन चार जणांकडून घेणेचा प्रसंग आला. परंतु देवलांच्यासारखे सर्वांगीण शिक्षक दुसरे कुणीही मला भेटले नाहींत. एका शिक्षकाचा भर कांही ठराविक गोष्टीवर होता. एकाचा फक्त मुद्राभिनयाची कसरत करून घेण्यावर होता. एकांचें शिक्षण कृत्रिम वाटलें. देवलांच्या शिक्षणांत विशेष हा होता की, शिकणाराची कुवत पाहून ते त्याला यथानुक्रम शिक्षण देत असत. त्यामुळें अगदी अशिक्षित सुद्धा त्यांच्या शिक्षणामुळे नट झाले. खरा नट तयार व्हायला शिकणाऱ्या नटांत उपजत नाट्य असलें तर तो नट खरा नट या संज्ञेला पात्र होतो. एरवी जेवढें शिकवावें तेवढें शिकलेले अनंत नट होते व आहेत. देवलांच्या शिक्षणाचा भर " मंत्रांवर " होता. तंत्राची विशेष चर्चा ते करीत नसत. रसानुकूल, व अर्थ समजून स्वाभाविक शब्दोच्चार, त्याला धरून मुद्राभिनय, यांवर त्यांचा मुख्य भर असे. नाटक कंपनींतच देवलांचा मुक्काम असलेमुळे तालमीच्या दुपारच्या ठराविक वेळे-शिवाय इतर वेळीं, इतकेंच काय परंतु चहा घ्यायचे वेळीं, जेवणावर बसलें असतांनासुद्धा, नाट्यशिक्षण सुरू असे. ते म्हणत, "नटाची तयारी इतकी झाली पाहिजे की झोंपेतुन उठवल्यावर अमुक प्रवेशांतील अमूक भाषण म्हण म्हटलें, तर नटाला तें म्हणतां आलें पाहिजे. " हल्लीं नटाला Mood " मूड " म्हणून एका विकाराची बाधा झाली आहे. परंतु खऱ्या नटाला " मूड " आणावा लागत नाही. सुरवात केल्याबरोबर " मूड " सहकारीच असतो.

देवलांचा वेदांताचा अभ्यास होता. ते थिऑसफिस्ट होते- स्नानसंध्या

वगैरे ते करीत नसत. पोषाख साधा अगदी शेवटपर्यंत कायम होता. कपड्यांच्या बाबतीत धोतरें खेरीज करून बाकीचा पोषाक स्वदेशी कापडाचा असण्याबद्दल त्यांचा कटाक्ष असे. जरी ते न्या. मू. रानडे यांचे अनुयायी होते, तरी लो. मा. टिळकांबद्दल त्यांना अनादर नव्हता. १८९७ सालीं टिळकांना शिक्षा झाली त्या वेळीं ते कंपनींत होते. त्यांना सबंध दिवस उदासवाणें वाटत होतें. त्या दिवशीं ते कुणाशींही फारसे बोलले नाहीत.

शेवटचीं तीन वर्षें ते गंधर्व नाटक मंडळींत येऊन जाऊन असत. गंधर्व मंडळीसाठीं " वत्सलाहरण " नाटक लिहिण्याचें त्यांच्या मनांत होतें. अभिमन्यू, वत्सला, व लक्ष्मण ( दुर्योधनपुत्र ) यांसाठी तीन लहान मुलें मला दाखवा म्हणजे मी नाटक लिहितों, असें ते म्हणत असत. रंगभूमीच्या कमनशिबानें हा बेत राहून गेला. देवल मधुमेहामुळे पायाला जखम होऊन अजारी झाले व शेवटीं गुडघ्यापासून त्यांचा पाय डॉ. वॉनलेस यांनी कापून टाकला. अशा रीतीने या थोर नाटककाराचा व नाट्यशिक्षकाचा अंत मिरज येथे ता. १४ जून सन १९१६ रोजीं वॉनलेसच्या हॉस्पिटलमध्ये झाला. मराठी रंगभूमीला व गंधर्व नाटक मंडळीला त्यांची शेवटची एक कृति, फाल्गुनराव या गद्य नाटकाला संगीत रूप देऊन " संशयकल्लोळ " या नांवाने प्राप्त झाली.

किर्लोस्कर मंडळींत गाणारीं मुलें होतीं त्या वेळेस त्यांनीं ' प्रियंवदा ' या पात्रासाठी शाकुंतलमध्ये पदें प्रसंगोपात केलेलीं अशीं होतीं—

पहिल्या अंकांत — शकुंतला म्हणते की " वल्कलांची गांठ प्रियंवदेनं घट्ट बांधली आहे. " त्यावर प्रियंवदा म्हणते—

पद

उचिच कां गे दोष मला देसी । ध्रु. ॥ वाढवि अवयव यौवन
म्हणुनी कंचुकि रुतति अशी ॥ १ ॥

तिसऱ्या अंकांत दुष्यंत शकुंतलेजवळ बसला असतां त्या दोघांना मनमोकळेपणाने बोलतां यावें म्हणून अनसूयेला खुणावून जातांना म्हणते,

पद

अनसूये तो पहा ! पहा । हरिण बाल उत्कंठित दिसतो ॥ धृ ॥
शोधितसे कीं निजमातेला । भेटवूं झडकरि तिजसी हा ॥ १ ॥

चवथ्या अंकांत विरहाकुल शकुंतला म्हणते की, " दुःखामुळे हें तपोवन सोडायला माझे पायच धजत नाहीत. " त्यावर प्रियंवदा म्हणते – " गडे तुझी एकटीचीच अशी अवस्था झाली असं तूं समजतेस काय !

पद

हें विरहदुःख होय तुला एकटिला का ? ॥ धृ ॥ जासि म्हणुनि वन उदास। मृग मुखिचा त्यजिति घास । पर्णरूप आसवास गाळिति बघ या लतिका ॥ १ ॥

# ३ : मोरो बापूजी वाघोलीकर

अनुक्रम.................. वि: ..........
........................ नों. दि: ..........

मोरोबा वाघोलीकर यांचें आडनांव देव होतें. ते वाईजवळ वाघोली गांवचे रहिवासी होते. लहानपणीं त्यांचें शालेय शिक्षण अगदीच कमी झालेलें होतें. साधारणपणें वाचतां व लिहिण्यापुरतें झालें असावें. मात्र लहानपणापासून त्यांना शरीर सुदृढ करण्याचा नाद असे. कारण त्यांचा बांधा सुडौल व प्रमाणबद्ध होता. खेडेगांवच्या राहणीमुळे त्यांना तमाशांतील लावण्या म्हणण्याचा नाद लागला. वाईला त्यांचा दैनंदिन क्रम दिवसभर गावांत भटकणें हाच. घरची वडिलोपार्जित शेती निर्वाहापुरती असावी. कृष्णा नदीवर पोहावें. लहानपणापासून साधुबैरागी यांच्याकडे जावें असा नाद असे. त्या वेळीं तेथे गोपाळबुवा म्हणून एक विक्षिप्त वृत्तीचे साधु असत, त्यांच्याजवळ ते जाऊन बसत. एके प्रसंगीं साधुमहाराजांनी कांही कारणावरून मोरोबाच्या थोबाडींत मारली आणि त्यामुळे आपला भाग्योदय झाला, असें त्यांच्या तोंडून ऐकलें. आवाज धारदार, गोड, असल्यामुळे लावण्या उत्तम म्हणतात असा त्यांचा लौकिक होता. या लावण्या म्हणण्याच्या नादामुळे ते एका तमासगिराच्या फडांत शिरले होते, असें ऐकिलें होतें. लवकरच ते त्यांतून सुटले व एका हरिदासाच्या मागे कीर्तनांत साथीला उभे राहूं लागले. तोहि व्यासंग सुटल्यानंतर ते गवई पेशाने हिंडूं लागले. पनवेलचे त्या वेळचे धनिक व्यापारी विठोबा खंडाप्पा गुळवे यांचेकडे त्या निमित्ताने जात असत. पुण्यासही त्यांचीं गाणीं होत असत. या त्यांच्या प्रसिद्धीमुळे अण्णासाहेब किर्लोस्करांची त्यांच्यावर नजर जाऊन, त्यांनी शाकुंतल नाटक करण्याचें ठरविल्यानंतर, मोरोबांना दुष्यंताच्या भूमिकेसाठी नियुक्त केलें. दुष्यंताच्या राजबिंडेपणाची मोरोबांच्या शरीरसौष्टव व स्वरूपांत छबी दिसल्यामुळे ही योजना यथायोग्यच झाली होती. मोरोबांचा रंग गव्हाळा, डोळे टपोरे व तेजदार होते; मिशा

थोड्या होत्या, मिशांचें जंगल नव्हतें. आवाज खणखणीत, झारदार व लावणींतल्या मुरक्या त्यांच्या गाण्यांत मजेदार येत असत. आवाज निकोप व दुष्यंताचीं एकशेआठ पदें म्हणण्याइतका दमदार होता. पदें फार घोळून म्हणण्याची पद्धत नव्हती. अर्थानुसंधानाने चरण एकदा, क्वचित् दोनदा म्हणत. म्हणण्याची लय साधारणपणें जलदपणावरच होती. बोलण्यांत थोडा दोष होता. मोठें वाक्य जोरांत बोलतांना कांही शब्द घसरगुंडीसारखे निघून जात. स्वभाव भोळसर, भाविक. आपण अशिक्षित आहोंत, ही त्यांना अंतर्यामीं जाणीव असे. कंपनीच्या व्यवस्थेंत त्यांनी कधी ढवळाढवळ केली नाही. त्यांचा भाऊरावांवर नितांत विश्वास होता. कुणी कांही वशिला, धर्मार्थ प्रयोग, मदत, मागायला आला असतां, ते मागणाराला सांगत, "तुम्ही भाऊरावांकडे जा. ते करतील तें मला कबूल आहे." भाऊराव अत्यंत हिशोबी होते, त्यांना मनोमन खात्री होती. म्हणून तो विश्वास दृढ झाला होता. त्यांनी शाकुंतलमध्ये दुष्यंत, सौभद्रांत अर्जुन, रामराज्यवियोगांत वसिष्ठ व विक्रमोर्वशीयमध्ये पुरूरवा, ह्या भूमिका निवृत्त होईपर्यंत केल्या. शापसंभ्रममध्ये ते केव्हा सूत्रधाराचीही भूमिका करीत असत. नाटकाच्या वेळीं त्यांना प्रॉम्प्टरची जरूर क्वचित् लागे. परंतु प्रॉम्प्टर असावाच लागे. ते रंगभूमीवर असतांना वाक्य चुकलें तर प्रॉम्प्टरचाच तो दोष. कारण 'किती हलके सांगतोस' हें त्यांचें वाक्य यायचेंच. प्रॉम्प्टरने वाक्य सांगावें व तें त्यांना आठवलेलें असावें. मग म्हणत, "किती मोठ्यानें सांगतोस, लोकांना ऐकूं जातें ना." अशी तऱ्हा होती. शाकुंतलमधील इतकीं पदें म्हणतांना त्यांचा आवाज थकत नसे. गाण्यांत तानांची वगैरे चमकदार फेक नसे, परंतु बारीक मुरक्या व खटके असत. मोरोबा रंगभूमीवर गेले की त्यांची सर्व हालचाल त्या भूमिकेला योग्य अशीच असे. रंगणें व कपडे घालणें कधी लवकर आटपायचें नाही. चेंगटपणा संपत नसे. रंगरचनेंत अगर वेषभूषेंत क्षुल्लक गोष्टसुद्धा विसरतां कामा नये याबद्दल दक्ष असत.

१८९३ सालीं भाऊराव शापसंभ्रमपासून पुरुष भूमिका करूं लागले. त्यांनी प्रथम विक्रमोर्वशीयमधील ऊर्वशीची भूमिका कृष्णराव गोरे यांच्या-

कडून बसवून घेतली, व एका नाटकांतील स्त्री भूमिका करण्याचें सोडलें. नंतर १८९५ सालीं मृच्छकटिक बसलें. त्यानंतर १८९७ सालीं शाकुंतलमधील शकुंतलेची भूमिका गोरे यांना बसवून देऊन स्वतः भाऊराव कण्वाची भूमिका करूं लागले. यामुळे मोराबांना असें वाटूं लागलें की भाऊरावांऐवजी लहान मुलांबरोबर भूमिका आपल्या रंगत नाहीत. त्यामुळे बराच काळ घरीं घालवून सौभद्र वगैरे लागायचे वेळीं कंपनींतून पत्र आलें की कंपनीच्या मुक्कामाला यायचे व तेंही अनिच्छेनेच, असें करूं लागले. १८९६ च्या डिसेंबरअखेर भाऊरावांनी स्त्री भूमिका सोडण्याचा मनाशीं निर्णय घेतला. त्यामुळे १८९७ जानेवारी ते जूनपर्यंत त्यांनी स्त्री भूमिका केलीच नाही. जून महिन्यांत कंपनी मिरजेला आली, तेव्हा मिरजेचे अधिपती श्री. बाळासाहेब यांनी भाऊरावांची मंथरेची भूमिका पाहण्याची तीव्र इच्छा प्रकट केली. तेव्हा मिरज संस्थानचे अधिपतींचे व आपले संबंध लक्षांत घेऊन भाऊरावांनी दोन स्त्री भूमिका केल्या. एक सौभद्रमध्ये सुभद्रा व रामराज्यवियोगांत ( सरकारी खाजगी ) प्रयोगांत मंथरेची भूमिका केली. भाऊरावांनी स्त्री भूमिका सोडण्याचें ठरविल्यावर मोरोबांनीही कंपनी सोडायचा निर्णय घेतला. मिरजेचे प्रयोग संपल्यावर कंपनीला वार्षिक सुट्टी झाली. मोरोबा, भाऊराव वगैरे आपल्या घरीं गेले. जातांना कंपनीच्या भागीदारींत बदल करायचें ठरलें. वार्षिक सुट्टी संपल्यानंतर मंडळी मिरजेस जमून नवीन झालेल्या सरकारी थिएटरमध्ये प्रयोग सुरू झाले.

मिरजेहून कंपनीचा मुक्काम सातारा येथे गेला. साताऱ्यास गेल्यावर रामभाऊ किंजवडेकर स्वतः वाईस जाऊन मोरोबांना घेऊन आले. मोरोबांनी निवृत्त व्हायचा निर्णय घेतला. कंपनीची मालमत्ता होती ती तिघां मालकांच्या मालकीची होती. तिच्यांतील मोरोबांच्या हिश्शाचें काय करायचें हें विचारल्यावर त्यांनी निर्लोभपणाने उत्तर दिलें कीं, " मी घरून एक सुतळीचा तोडासुद्धा आणला नव्हता. मला या मालमत्तेचा कसलाही मोबदला नको. " तेव्हा मोरोबांना नफ्यामध्ये एक आणा भागी द्यायचें ठरलें. जुनी भागी रद्द होऊन नवीन भागीपत्र अण्णासाहेबांच्या तसबिरीसमोर ठेवून, नमस्कार करून, सर्वांना नमस्कार करून टांग्यांत बसून, वाईस मोकळया अंतःकरणाने निघून गेले.

त्यानंतर मोरोबा सन १८९९ सालीं मुंबईस शारदा नाटकाच्या वेळीं आले होते. नंतर १८०० सालीं भाऊराव आजारी असतां जोगळेकरांना अर्जुनाच्या भूमिकेची तालीम देणेसाठी आले होते. १९०१ सालीं मुंबईस जोगळेकरांना दुष्यंताची भूमिका शिकवायला आले होते. १९०० सालीं मार्चमध्ये पुण्यास शारदा नाटकाचे प्रयोग चालू असतां आले होते. त्या वेळीं होलिकामहोत्सव कंपनींत साजरा झाला होता. बाळकोबा नाटेककरांना भाऊरावांनी बोलावून आणलें. सात वर्षांनी बाळकोबा कंपनींत आले. या प्रसंगीं ह्या तिघां महाकलावंतांनी होलिकोत्सवांत गायनांत भाग घेतला होता. तिघांनीही लावण्या म्हटल्या होत्या. १९०६ सालीं पुण्यास किर्लोस्कर कंपनीची पंचवीस वर्षांची रौप्यजुबिली साजरा झाली. मोरोबा आले होते. परंतु त्या वेळीं त्यांना साधारण अंधत्व आलें होतें. असा हा संगीत नाटकाचा पहिला नायक १९०८ सालीं कैलासवासी झाला. मोरोबांचा आवाज गोड होता. कंपनी सोडल्यावर जेव्हा जेव्हा कंपनींत येत, त्या वेळीं प्रातःकाळीं "गंगालहरी" गोड गळ्याने म्हणत असत. मृत्युसमयीं त्यांची आर्थिक परिस्थिति ठीक होती. मोरोबांना दोन मुलगे होते. पैकीं एक मुलगा नरहरी तरुणपणांतच वारला. दुसरा दत्तु हा पुष्कळ वर्षें पुण्याच्या राजगुरु प्रेसमध्ये भागीदार होता.

मोरोबा देखणे होते. विशेषेंकरून त्यांचे डोळे उन्नत, मोठे व पाणीदार होते. रंग गव्हाळा असून शरीरही अतिशय बांधेसूद होतें. कंपनी सुटेपर्यंत रोज एक शिशवीच्या लांकडाची जोडी होती ती करीत असत. त्यांची शेंडी भरदार व लांब होती. शरीराची निगा उत्तम राखीत असत. व्यायाम करीत असत. त्यासाठी रोज बदामाचा शिरा व नुसत्या दुधांतील चहा घेत. ते सतार वाजवीत असत व त्यांची सतार मोठी, दोन भोपळ्याची असे. स्नानसंध्या नेमाने करून रोज ज्ञानेश्वरी वाचीत असत. त्या वेळच्या प्रचलित व्यसनांत कांही काळ तेही प्रवाहपतित होऊन वाहत गेले होते. पुढे उपरती होऊन कांदा, लसूण खाणेंसुद्धा त्यांनी वर्ज्य केलें. मुंबईस ते गोकूळदास देवजी या गुर्जर सद्गृहस्थाकडे जात; तेही मोठे धार्मिक होते. मोरोबांना साधु, बैरागी यांच्याकडे जाण्याचा नाद असे. पुण्यास शाकुंतल

नाटकाचा प्रथम प्रयोग झाला. त्या दिवशीं मोरोबा पुण्याचे श्री जंगली महाराज यांना बोलवायला गेले होते. जंगली महाराज प्रयोग पाहण्यास आले नाहीत. परंतु मोरोबांनी विनंति केली होती की, " मला जबाबदारीची भूमिका करायची आहे, तेव्हां आपण समोर येऊन बसलांत तर मला धीर येईल. " तेव्हां जंगली महाराजांनी त्यांना ऊदाची चिमूट देऊन सांगितलें कीं, " बेटा घबराव मत. ये ले जा उदी. " नंतर मोरोबांनी लोबान ऊद आणून ती उदी त्यांत मिसळून नाटकाच्या सुरवातीस ऊद घालायला सुरुवात केली. कंपनींतून निवृत्त होईपर्यंत ते स्वतः दर नाटकाला ऊद घालीत असत. तेव्हापासून नाटक मंडळ्यांत कांही कंपन्यानी ती पद्धत चालू केली, ती अजून चालू आहे. मोरोबांचें शिक्षण साधारण सही करण्या-इतकेंच होतें. सही करायला पांच मिनिटें लागत. व्यवहारासंबंधी त्यांचा भाऊरावांवर पूर्ण विश्वास होता.

# ४ : बाळकृष्ण नारायण (बाळकोबा) नाटेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८७२ वि: प्राचीन
क्रमांक १९०२ नोंद दि. २०१३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १३२२२
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

बाळकोबांची पूर्ववयाची हकिकत फारशी माहीत नाही. बाळकोबांचें प्राथमिक शिक्षण साधारण इंग्रजी लिहिण्या वाचण्यापुरतें होतें असें सांगतात. त्यांना गाण्याचें शिक्षण त्यांचे वडिलांनींच दिलें होतें. बाळकोबा हे हुषार असल्याने, शास्त्रीय पद्धतीच्या जुजबी गाण्याशिवाय, ते लावणी व ठुंबरी उत्तम गात असत. एखादा भिकारी एकतारीवर रस्यावर गातांना ऐकला तरी त्याच्या गाण्यांतील विशिष्ट गोडवा ते लगेच आत्मसात करीत. अण्णासाहेब किर्लोस्करांचा सहवास होईपर्यंत बाळकोबा खासगी गाण्याचे कार्यक्रम व कांही गायनाच्या शिकवण्याही करीत असावे. पुण्यास त्या वेळीं बाळकोबा नाटेकर व अण्णासाहेब घारपुरे हे दोघेही सतारवादनपटु व गाण्यांतील तज्ञ समजले जात. कुठल्याही मैफलीला हे दोघेजण हजर असत. दोघांचाही स्वभाव मिस्कील असल्याने साधारण गायकाची मैफल सफल होण्याची आशा नसे, असें ऐकलें आहे.

संगीत शाकुंतल बसवायचें ठरल्यावर दुष्यंत व कण्व या दोन भूमिकांसाठी अनुक्रमें मोरोबा वाघोलीकर व बाळकोबा नाटेकर यांना अण्णासाहेबांनी नियोजित केलें. पहिल्या दिवशीं कण्वाची भूमिका करतांना बाळकोबा थोडे घाबरले होते, असें शंकरराव मुजुमदारांच्या तोंडून ऐकलें. परंतु लागलीच सावरून बाळकोबांनीं आपल्या मधुर आवाजाने व रसपूर्ण गाण्याने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलें. त्यानंतर सौभद्र नाटकांत नारदाची व कृष्णाची भूमिका बाळकोबा करीत असत. रामराज्यवियोगांत प्रथम कांही वेळां शंबूकाची व नंतर केव्हा तरी वसिष्ठाची भूमिका करीत असत. विक्रमोर्वशीयमध्ये चित्रसेन गंधर्व व नारद या भूमिका ते करीत असत.

कण्वाच्या भूमिकेंत बाळकोबा पद्यगायनांत करुणरस मूर्तिमंत उभा करीत. बडोद्यास श्री. सयाजीराव महाराजांच्या राज्यारोहणाच्या प्रसंगीं अण्णा-

साहेबांना बडोदे राज्याकडून एका खास प्रयोगासाठी आमंत्रण आलें होतें. तें १८८३ साल असावें. त्या वेळीं भाऊराव कोल्हटकर कंपनींत होते व वास्तविक सौभद्र नाटक व्हायचें. परंतु भाऊरावांची एक अट होती की, वडील मातुश्री बडोद्यास आहेत, तोंपर्यंत मी स्त्रीभूमिका तेथे करणार नाहीं. म्हणून शकुंतला गद्य ठेवून शंकरराव मुजुमदारांना पुन्हा शकुंतलेची भूमिका करावी लागली. भाऊराव आल्यानंतर शकुंतलेचें पात्र संगीत केलें होतें.

या बडोद्याच्या खास सरकारी प्रयोगास दरबारी लोक व राज्यांतील थोर थोर कलावंत हजर होते. त्या दिवशीं बाळकोबांनी, समोर तज्ञ मंडळी पाहून, गाण्याची हद्द केली, असें मला भाऊरावांनी सांगितलें. बाळकोबांच्या बरोबर, त्या वेळीं बडोद्यास असलेले प्रसिद्ध सारंगीया भगवानदास हे होते. ते गाण्याने इतके भारावले कीं शेवटीं हातातील सारंगी वाजवायचा गज त्यांच्या हातांतून पडला. त्या दिवशीं बाळकोबांनीं गोड सूर व मींड यांनी गाणें नटवून सर्व पदांत फक्त एकदाच एका पदांत तान घेतली. "निग्रहानुग्रही दक्ष आम्हि जाण हे" या पदांत पद संपवितांना "मुला सांग नृपतीस" यांत "मुला" शब्दावरती तान घेतली. प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. बाळकोबांच्या गाण्याने खूष होऊन नाटक संपल्यावर किर्लोस्कर मंडळीला लोकांनीं एक गाण्याची दावत दिली. बाळकोबा थोडे मत्सरी असत असें जुने लोक सांगत. भाऊरावांनी एकदा सही सही बाळकोबांचीं पदें, अण्णासाहेबांनी सांगितल्यावर, ऐकवलीं. तेव्हापासून बाळकोबांनी कंपनींत नाटकाशिवाय गायचें नाहीं, असें ठरविलें होतें. आपलें गाणें चोरलें जाऊं नये ही इच्छा.

सौभद्र नाटकांत नारदाच्या भूमिकेंत बाळकोबांच्या प्रवेशाच्या वेळीं त्यांच्या सतारीचा ध्वनि वुइंगमध्ये ऐकला की बाहेर टाळी पडे. स्वतः उत्तम सतार-वादनकार असल्यामुळे नारदाच्या पदांना सतारीची स्वतः साथ करून आपल्या गोड गळ्याची जोड देऊन लोकांना गुंगवीत असत. बाळकोबा उत्तम नट होते. त्यांची कृष्णाची भूमिका फार बहारीची होत असे. बाळकोबा सबढंगी गायक असल्याने त्यांनी शाकुंतलमध्ये ज्या भूमिका केल्या, त्या, अशा; पारिपार्श्वक, सारथी, सेनापति, कण्व, पांचवा अंक कंचुकी, सहावा अंक कंचुकी, व मातली, इतक्या भूमिका ते शाकुंतलमध्ये करीत असत. किर्लोस्कर मंडळींत लहान

भूमिका, मोठी भूमिका हा पंक्तिप्रपंच नसे. बाळकोबांनी कण्वाच्या भूमिकेंत "ज्याच्या तोंडीं दर्भानें" या पदाची मूळ साधी चाल बदलून जी सुस्वर व रसानुकूल चाल लावली तीच हल्ली कधी कधी ऐकूं येते. तीच चाल, तशीच शेवटच्या "परक्याचें धन" या साकीला त्यांनी लावलेली चाल इतकी गोड आणि रसानुकूल आहे की, ते सूर ऐकतांना शकुंतला गेल्याचें विरहदुःख प्रेक्षकांच्या हृदयांत जागृत होतें.

किर्लोस्कर कंपनी १८८४ मध्ये स्थापन झाली. त्या अगोदर भागीदारीचे पद्धतशीर जमाखर्च ठेवलेले नसत. येईल ती जमा व होईल तो खर्च अशी स्थिति होती. त्यामुळे हितसंबंध नीट सुरक्षित जपले जातील किंवा कसे या साशंक मनोवृत्तीने बाळकोबांनी भागीदारींत जाण्याचें नाकारून, द. म. दोनशे रुपये पगार ठरवून घेतला. मात्र त्यांचा मानमरातब भागीदारांप्रमाणे ठरविला गेला होता. कंपनीच्या सर्व लोकांत मिळून मिसळून वागण्याची त्यांची प्रवृत्ति असून, ते अत्यंत विनोदी असत. अण्णासाहेबांच्या हयातींत व नंतरही बाळकोबांची वृत्ति अडवणूक करण्याचीं असे. ग्वाल्हेर येथे किर्लोस्कर कंपनी गेली असतां तेथील प्रसिद्ध सतारीया अमीरखां यांचा सतारवादनाचा गंडा त्यांनी बांधला होता.

१८९०।९१ च्या सुमारास त्यांच्या नाकांत पिनस उत्पन्न होऊन त्यांच्या आवाजांत दोष उत्पन्न झाला. व त्या वेळीं किर्लोस्कर कंपनीच्या भागीदारांना प्राप्ती कमी होऊं लागल्यामुळे व आवाजाच्या वैगुण्यामुळे त्यांच्या गाण्याचें आकर्षण कमी झाल्यामुळे, त्यांनी पगार कमी घ्यावा अशी भागीदारांनी इच्छा प्रदर्शित केल्यावरून त्यांनी दीडशे रुपये पगारावर राहण्याचें नाइलाजाने कबूल केलें.

१८९३ सालीं कंपमीने पुण्यास सुट्टी घेतली. सुट्टी संपल्यावर पुण्यास प्रयोग सुरू व्हायचे वेळीं बाळकोबांनी त्या वेळचे कंपनीचे जनरल मॅनेजर डॉ. ग. कृष्ण गर्दे यांना पत्र लिहून कळविलें की, "दीडशे रुपये पगार मला कायम दिला जाईल असें लेखी आश्वासन भागीदार देत असतील तरच मी कंपनींत राहीन." प्रयोग सुरू झाल्यावर याची वाटाघाट करूं असें ठरलें. प्रयोग सुरू झाले, वाटाघाट सुरू झाली. भाऊराव कोल्हटकरांचें म्हणणें असें

पडलें की, " आपला धंदा लोकप्रियतेवर अवलंबून असल्यामुळे असलें लेखी आश्वासन देणें योग्य होणार नाही. " शेवटीं एकमत न होऊन बाळकोबा रंगभूमीवरून नित्रृत्त झाले.

बाळकोबांच्या गायनाच्या निपुणतेबद्दल भाऊरावांना फार आदर होता. ते म्हणत माझ्या गाण्याचें श्रेय बाळकोबांच्या सबरंगी गाण्यालाच आहे. एक तऱ्हेने ते माझे श्रवणगुरुच आहेत. पुढे बाळकोबा पुण्यांत एका शाळेंत गायनशिक्षण, सतारवादनशिक्षण करीत. कधी कधी खाजगी गाणें करून पुण्यास राहत. दुसऱ्या कंपनींत गेले नाहीत. असा हा संगीत नाटकाला वळण लावणारा व संगीत नाटकांतील पदें म्हणजे खरें संगीत मानणारा थोर कलावंत १९१० सालीं पुण्यास दिवंगत झाला. त्यांना पुत्रसंतति नव्हती. एक कन्या होती.

लक्ष्मण बापूजी ऊर्फ

# ५ : भाऊराव कोल्हटकर

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३४०९२ वि. चरित्र
क्रमांक ९९०२ नों. दि. २०।२।६३

जन्म—शके १७८४ फाल्गुन शु. १४ मु बडोदे. मृत्यु — ता. १३ फेब्रुवारी सन १९०१ पुणे.

भाऊराव कोल्हटकर हे संगीत नाट्यसृष्टींत एक अद्वितीय नट होऊन गेले. त्यांना सुस्वरूपपणा, अत्यंत गौरवर्ण व गंधर्वतुल्य आवाज या गुणांची परमेश्वराने, संगीत नाट्याचा उत्कर्ष होण्यासाठीच जणू खैरात केली होती. भाऊरावांचे आजोबा कोकणांतील रत्नागिरी जिल्ह्यांतील संगमेश्वर तालुक्यांतील माखजन या गावाहून बडोदे येथे आले. त्यांचाही पेशा हरिदासांचाच होता. बडोद्यास श्री निळकंठेश्वराचें मंदिर दांड्या बाजारांत आहे, त्या देवळाच्या ओरींत ते वस्तीला राहिले. त्यांच्या समागमें भाऊरावांचे वडील बापूबोवाही होते. भाऊरावांना त्यांच्याशिवाय चार भावंडें होतीं. वडील बंधु रामचंद्र उर्फ अप्पाराव, धाकटे बंधु गणपतराव, व दोन बहिणी. भाऊरावांच्या आजोबांपासून आजतागायत या कोल्हटकर कुटुंबाचें वास्तव्य श्री निळकंठेश्वराच्याच मंदिरांत आहे.

भाऊरावांचे वडील कीर्तनावरच उपजीविका करीत असत. भाऊरावांचें प्राथमिक शिक्षण मराठींतून झालें. गुजराथी बोलतां व वाचतां येत असावें. या शिक्षणाबरोबर गाण्याचें शिक्षणही सुरू होतें. ध्रुपद, ठुंबरी, वगैरे गाणें शिकले. त्या वेळीं श्री. मल्हारराव महाराजांची कारकीर्द होती. त्यामुळें तमाशे उत्तमपैकी बडोद्यास असत व त्यांतील लावण्याही फार उत्तम असत. अप्पाराव व भाऊराव हे रात्रीं निळकंठेश्वराच्या देवळांत सभामंडपांत निजत असत. वडील माणसें रात्रीं निजलीं कीं गांवांत जेथे तमाशाचे फड चालू असत तेथे उभयतां बंधूनीं रात्रीं तमाशास जावें, लावण्या ऐकून आत्मसात कराव्या, व गुपचूप येऊन देवळांत निजावें, असा क्रम असे.

या दोघां बंधूंच्या गाण्याची कीर्ति बडोद्याचे श्री. भाटवडेकर यांचेमार्फत अण्णासाहेब किर्लोस्करांच्या कानीं आली. त्या वेळीं अप्पारावांचेंच नांव पुढे आलें होतें. अप्पारावांना मुंबईस बोलावून घेऊन त्यांचें गाणें ऐकून त्यांनाच संगीत स्त्री भूमिकेसाठी आणायचें ठरलें. त्याप्रमाणे मोरोबा वाघोलीकरांना, बरोबर पांचशे रुपये, देऊन बडोद्यास रवाना केलें.

त्या वेळची मोरोबांनी सांगितलेली हकिकत पुढीलप्रमाणें; मोरोबा म्हणाले,

"मी मुंबईहून पहाटे बडोद्यास पोंचलों. टांगा दांडे बाजारांत नेल्यावर तेथे निळकंठेश्वराच्या मंदिराचा शोध केला. इतक्यांत एक सवाष्णबाई पूजा-साहित्य घेऊन सामोरी आली. तिला विचारलें की, निळकंठेश्वराचें देऊळ कुठें आहे? तिने सांगितलें, चला, मी तिकडेच चाललें आहें. तिथे नेल्या-वर ती बाई गेली व मी मंदिरांत शिरलों. तों हातांत दिवली घेऊन भाऊ-रावांचे वडील, कानावर जानवें ठेवून, प्रातर्विधीला निघाले होते. त्यांनी सांगितलें, बसा, इतक्यांत मुलें येतील. आंत जाऊन बसल्यावर भाऊराव झोपेंतून उठून आले. नमस्कार चमत्कार होऊन मोरोबांचे प्रातर्विधी आटो-पल्यावर अप्पाराव बाहेरून आले. चहापाणी झाल्यावर थोडी बातचीत झाली. नंतर सर्वजण गायले." नंतर त्यांना मोरोबांनीं सांगितलें की, "अप्पाराव तुम्हांला न्यायला मी आलों आहें." अप्पाराव म्हणाले, "वडील वृद्ध आहेत, मीच घरांत कर्ता आहे, म्हणून पंचाईत आहे." त्यावर भाऊराव आपणहून म्हणाले "अप्पा, मी जाऊं कां रे?" भाऊ-रावांचें गाणें मोरोबांनी ऐकलेंच होतें. भाऊराव अप्पारावांपेक्षा नाकीं डोळीं नीटस होते. त्यावर मोरोबांनी भाऊरावांस नेणेचा निश्चय केला.

भाऊरावांच्या वडिलांना पांचशे रुपये देऊन, मोरोबांनी भाऊरावांना बरोबर घेऊन मुंबईस प्रयाण केलें. ता. २० सप्टेंबर १८८२ रोजीं भाऊराव किर्लोस्कर मंडळींत मुंबईस मुक्कामीं दाखल झाले. तिथपासून आठच दिवसांत शाकुंतलमधील नटीच्या कामाची तयारी होऊन, भाऊरावांनी रंगभूमीवर गेइटी (हल्लीचें कॅपिटॉल) थिएटरमध्ये नटीच्या वेषांत पदार्पण केलें. किर्लोस्करांनी एक गाणारा मुलगा आणला आहे ही वार्ता मुंबईत पसरल्यामुळे त्या प्रयोगाला अतिशय गर्दी होऊन अठराशे रुपये उत्पन्न

झालें. या एकाच प्रयोगांतील दोन तीन पदांमुळे व गंधर्वतुल्य आवाजामुळे सर्व मुंबईभर एकदम प्रसिद्धि झाली. याच सालीं नोव्हेंबरमध्ये पुण्यास अप्पा बळवंत चौकांतील "पूर्णानंद" नाटकगृहांत सौभद्राचा पहिला प्रयोग झाला. फक्त तीन अंकांचा प्रयोग झाला. कारण, पुढचे दोन अंक लिहावयाचेच राहिले होते. नंतर मंडळी पुन्हा घरोघर गेली व अण्णासाहेब नोकरीवर रुजू झाले. रजा घेऊन मुंबईस येऊन सौभद्राचे दोन अंक पुरे करून भाऊरावास बडोद्याहून बोलावून घेतलें. नंतर पुढचे दोन अंक बसवून, सौभद्राचे सबंध नाटकाचे प्रयोग सुरू झाले. १८८४ मध्ये 'रामराज्यवियोग' नाटक तीन अंक बसून त्याचे प्रयोग सुरू झाले. आणि याच वेळीं किर्लोस्कर मंडळीला पनवेल मुक्कामीं कंपनी म्हणून स्वरूप प्राप्त झालें.

बाळकोबा नाटेकरांचें गाणें ऐकून त्यांचें गाणें भाऊरावांनी सही सही आत्मसात केलें होतें. नुसतें ऐकलें कीं गळ्यांत उतरलें अशी त्यांच्या आवाजाची तयारी होती. इतरांना ऐकून घटवावें तरी लागे, परंतु भाऊरावांनी ऐकलें की, आत्मसात होत असे.

एका प्रसंगीं मुंबईस बाळकोबा नाटेकर शाकुंतल प्रयोगास आले नाहीत. त्या दिवशीं भाऊरावांनी कण्वाची भूमिका करून सर्वांस थक्क केलें. त्यांची शकुंतलेची भूमिका त्या दिवशीं भास्करबुवा बखले यांनी केली होती.

रामराज्यवियोग नाटक पनवेलीस तीन अंक तयार झालेले बसवून रंगभूमीवर आलें. राम, सीता, भरत या भूमिकांना लहान मुलें मिळवण्याचे प्रयत्न सुरू होतेच. तीं तीन मुलें मिळाल्यानंतर पुढील दोन अंक लिहून तयार करायचे होते. अण्णासाहेबांनी लिहिण्याची सुरुवात राम व सीता यांच्या प्रवेशाने केलेली अण्णासाहेबांच्या चरित्रांत आहे.

१८८५ सालीं किर्लोस्कर कंपनीने अण्णासाहेब दिवंगत झाल्यानंतर सन १८८८।८९ च्या सुमारास देवलांचें विक्रमोर्वशीय नाटक बसविलें. त्यांत भाऊराव ऊर्वशीची भूमिका करीत असत. १८९१ सालीं, अण्णासाहेबांचीं अडीच नाटकें व विक्रमोर्वशीय यावर कंपनीचा गाडा चालू राहणें कठीण वाटूं लागलें, व भाऊरावांना स्त्री भूमिका करणें योग्य वाटेनासें झालें. म्हणून

किर्लोस्कर मंडळी बंद करण्याचें बोलणें सुरू होऊन मुंबईस किर्लोस्कर मंडळीचे शेवटचे प्रयोग सुरू झाले. येवढी नामांकित कंपनी बंद होणार म्हणून जनतेमध्ये चर्चा सुरू झाली. मंडळीच्या पुरस्कर्त्यांची एक बैठक होऊन, कंपनी बंद न ठेवतां स्त्री भूमिकेसाठी एखादा गाणारा सुस्वरूप मुलगा पाहावा म्हणून कोकण प्रांतांत सफर काढण्याचें ठरलें. त्याप्रमाणे कंपनीने कोकण दौरा सुरु करून पहिला मुक्काम चिपळूणचा घेतला. चिपळूण येथे देवलांचें शापसंभ्रम नवीन नाटक बसविण्याचें ठरून भाऊरावांनी पुरुष भूमिका पुंडरीकाची करण्याचें ठरलें व तेथेच तालमी देणेस देवलांनीं सुरुवात केली. कंपनीचा मुक्काम, चिपळूण, रत्नागिरी, वेंगुर्ले, असा होऊन कंपनी कर्नाटकांत आली. फिरत फिरत १८९३ सालाच्या पावसाळ्यांत कंपनी पुण्यास येऊन कांही प्रयोग करून कंपनीने वार्षिक सुट्टी घेतली. सुट्टीनंतर कंपनीने शापसंभ्रम नाटकाचा तीन-अंकांचा प्रथम प्रयोग पुण्यास केला. मुक्काम संपतांच बाळकोबा नाटेकर यांनी किर्लोस्कर मंडळी सोडली. नंतर कंपनी फिरत फिरत इंदूर येथे गेली. तेथे शापसंभ्रमाचा पांच अंकांचा प्रयोग झाला. तेथून नाशकास येऊन तेथे सात अंकांचा प्रयोग कांहीही भाग अगर पदें न गाळतां केला. परंतु प्रयोगास ८ तास लागले. म्हणून मुंबईस मुक्काम आल्याबरोबर प्रयोगांत काटछाट करून सुटसुटीत साडेपांच अगर सहा तासांचा प्रयोग करण्यांत आला. या मुक्कामांत भाऊरावांचा एक अल्पवयी मुलगा एका प्रयोगाचे दिवशीं मृत्यु पावला. प्रयोग बंद करायचा अशी भाषा सुरू झाल्यावर, भाऊरावांनी सांगितलें की प्रयोग बंद करायचा नाही. परंतु मंडळींनी त्यांचें न ऐकतां प्रयोग बंद ठेवला. तेथून कंपनी कोल्हापुरास गेली. तेथे देवलांचें मृच्छकटिक बसवून भाऊरावांनी चारुदत्ताची भूमिका करण्याचें ठरलें. तालमी सुरू झाल्या. नाटक बसून १८९५ सालच्या सुरुवातीस मृच्छकटिक नाटकाचा पहिला पांच अंकांचा प्रयोग कोल्हापुरास झाला व तेथून मिरजेस केला व कंपनी, मे महिन्यांत पुण्यास आली. भाऊरावांचे वडील निवर्तल्यामुळे पधरा दिवस कंपनीचे प्रयोग बंद ठेवून भाऊराव वडिलांचे और्ध्वदेहिकासाठी बडोद्यास गेले. या अगोदर मुंबईच्या मुक्कामांतच, वीरतनय हें श्री. कृ. कोल्हटकरांचें बक्षीस लावून

पसंत झालेलें नाटक सुट्टीनंतर बसवायचें ठरून कंपनीने वार्षिक सुट्टी घेतली.

१८९५ च्या आक्टोबरमध्ये मुंबईस पदांच्या चाली कोल्हटकरांनी सांगायला सुरुवात केली. पुण्यानंतर सोलापूर, बार्शी करून मंडळी अहमदनगरला गेली. तेथे वीरतनय नाटकाचा पहिला प्रयोग झाला ( १८९६ मे ). नंतर नाशिक, कल्याण होऊन कंपनीने वार्षिक सुट्टी घेतली. कल्याण मुक्कामीं मुंबईचा एक धनिक कोळी ढोका दुमिन नाखवा या नांवाचा येऊन किर्लोस्कर कंपनीचें मुंबईचें कॉन्ट्रॅक्ट मागूं लागला. भाऊरावांनीं ' आमची कॉन्ट्रॅक्ट देणेची वहिवाट नाहीं ' असें त्याला सांगून वाटेला लावला. आगष्टमध्ये मुंबईस प्लेगाची साथ सुरू झाली. वार्षिक सुट्टीनंतर मुंबईस कंपनीचे रिपन थिएटरमध्ये प्रयोग सुरू झाले. पहिल्या प्रयोगाचे दिवशीं ढोका दुमीन नाखवा हा कोळी पुन्हा येऊन भाऊरावांची त्याने अतिशय विनवणी केली. शेवटीं शहरांत साथ सुरू झालेली पाहून भाऊरावांनी कॉन्ट्रॅक्ट दिलें. एकोणीस प्रयोगास साडेदहा हजार रु. ठरले. कोणाकडून कॉन्ट्रॅक्ट मोडेल त्या मोडणारानें दुसऱ्यास दोन हजार रुपये दंड म्हणून द्यावे असें ठरलें होते. सात आठ प्रयोगांतच त्याला, साथ सुरू असलेने, नुकसान येऊं लागलें. तेव्हां उभयतांचे खुषीने कॉन्ट्रॅक्ट रद्द केलें. परंतु भाऊरावांनी नुकसानभरपाई दोन हजार रुपये घेतले नाहीत. पुढे कंपनीने अंगावर प्रयोग सुरू केल्यावर उत्पन्न उत्तम होऊं लागलें. कारण भाऊरावांच्या सुभद्रा शकुंतला, मंथरा या स्त्री भूमिका पुन्हा पाहायला मिळणार नाहीत असें प्रसिद्ध झालें होतें. वीरतनय नाटकांत भाऊरावांची शूरसेनाची भूमिका फारच तडफदार होत असे. प्रयोगास उत्पन्न होत आहे असे पाहून सदर कोळी याने पुन्हां दोन प्रयोगांचें कॉन्ट्रॅक्ट घेऊन नशीबाची परीक्षा पाहिली. परंतु ते शेवटचे प्रयोग असूनही, मुंबईस मृत्युसंख्या वाढूं लागली, त्यामुळे लोक हवालदिल झालेले व बाहेरगांवी जाऊं लागलेले, त्यामुळे, त्याला नुकसानच झालें. नंतर कंपनी कोल्हापुरास गेली.

कोल्हापुरास राजाराम कॉलेजमध्ये प्रदर्शन भरलें होतें. श्री. बाळासाहेब मिरजकर, मिरजेचे अधिपती, यांनी फोनोग्राफच्या बांगड्यावर भाऊरावांचीं

पदें घेतलीं. त्यानंतर १८९८ सालीं नागपुरास देवल हे शारदा नाटकाचे दोन अंक घेऊन आले. धुळे येथे मे महिन्यांत शारदेच्या तालमी सुरू झाल्या व १८९९ च्या जानेवारींत इंदूर येथे शारदेचा तीन अंकांचा प्रयोग होऊन मंडळी उज्जनी येथे श्री. माधवमहाराज शिंदे यांच्या समोर दोन प्रयोग करण्यासाठी गेली. तेथे नानासाहेब जोगळेकर यांची भेट झाली. त्यांना भाऊरावांनी कंपनींत येणेबद्दल सुचविलें. नंतर देवास, भुसावळ, एरंडोल, अहमदनगर, सोलापूर हीं गावें घेऊन मंडळी जुलैच्या सुमाराला मुंबईस गेली. मुंबईचे प्रयोग होऊन वार्षिक सुट्टी झाली. सुट्टीमध्येच श्री. शिंदे सरकारांचें खास बोलावणें आलें व ग्वाल्हेर येथे जाण्याचें ठरलें. वार्षिक सुट्टी संपल्यावर प्रयोग मुंबईस सुरू झाले. त्या वेळीं कच्छ प्रांतांत भयंकर दुष्काळ पडला होता. मदतीदाखल वीरतनय नाटकाचा प्रयोग केला. त्या प्रयोगास २७०० रु. उत्पन्न झालें. कंपनीने कसलाही खर्च घेतला नाही, म्हणून प्रसिद्ध होतांच रंगभूमीवर खर्चाच्या पैशासाठी अक्षरशः नोटा व पैसे यांची बरसात झाली. या प्रसंगीं भाऊरावांचा सत्कार होऊन त्यांना मानपत्र देण्यांत आलें. जाहीर सन्मान असा हा नाट्यसृष्टींत प्रथमच झाला. त्या वेळीं सत्कार, पदकें यांचें खूळ माजलें नव्हतें. या वेळेपासून भाऊरावांची प्रकृति ढासळायला लागली होती. ग्वाल्हेर येथे सरकरी खास प्रयोग, जुन्या राजवाड्याच्या पटांगणांत कच्चें थिएटर बांधलें होतें, त्यांत झाले. पांच खास प्रयोगापोटीं श्री. शिंदे सरकारनीं साडे सात हजार रुपये दिले. त्याशिवाय श्री. सरदार आंग्रे यांचेही तीन खास प्रयोग झाले व गावांतल्या लोकांसाठीही प्रयोग झाले. तेथेच भाऊराव व रामभाऊ किंजवडेकर यांचे मतभेद विकोपाला जाऊन रामभाऊंनी कंपनी सोडण्याचें ठरविलें. परंतु ज्या गावांत आपण मानाने वागलों तेथे फाटाफूट नको म्हणून भाऊरावांनी रामभाऊंपुढे पदर पसरला. तेथून इंदूरला जायचें ठरलें. ग्वाल्हेरमध्ये एका शाकुंतलमध्ये दुष्यंताची भूमिका करीत असतां फार अशक्तता वाटूं लागली, म्हणून पोटाला पट्टा बांधून पुढील नाटक संपविलें. त्या वेळीं भाऊराव शंकररावांना म्हणाले, 'मला जिवंत ठेवावयाचें असेल तर पुन्हा इतक्यांत शाकुंतल लावूं नका.'

इंदूर येथे पांच प्रयोग होऊन रामभाऊंनी भागीदारी सोडण्याचें ठरून ते ग्वाल्हेरीस परत गेले. प्रकृतिस्वास्थ्यासाठी भाऊरावांनी कंपनीस सुट्टी द्यावयाचें ठरवून सर्व सामानासह कंपनी पुण्यास आली. शारदा नाटक, सुट्टी घेतल्यामुळे पाहावयास मिळाणार नाही, म्हणून पुण्यांतील जनतेने केसरी वर्तमानपत्रांतून शारदा नाटकाचा प्रयोग करणेबद्दल आग्रह केला. तेव्हा पुण्यास आर्यभूषण थिएटरमध्ये तीन प्रयोग शारदेचे व एक प्रयोग शापसंभ्रमाचा असे चार प्रयोग झाले. रंगपंचमी झाल्यावर सुट्टी दिली. सर्व मंडळी घरोघर गेली. कृष्णराव गोरे ग्वाल्हेरीस गेले. भाऊरावांनी त्यांना समजून सांगितलें की, " राजेलोकांची लहर कायम राहत नाही. तुला पश्चाताप होईल. जा. कंटाळा आला म्हणजे पुन्हा निःशंक मनाने ये. " मार्च महिन्याच्या मध्यापर्यंत प्रयोग झाले व पुण्याच्या पहिल्या प्रयोगाला भाऊरावांना नाटकाचे सुरवातीस मोठी उलटी झाली; त्यामुळे त्यांना फार अशक्तता आली. परंतु कोदंडाच्या भूमिकेंत रंगभूमीवर प्रवेश करून " नामें ब्राह्मण खरा असे हा " या साकीला सुरुवात करतांच आलेल्या अशक्ततेचा भास सुद्धा आवाजांत झाला नाही. मात्र शारीरिक अशक्ततेने, हिरण्यगर्भाच्या खांद्यावर टेकून मधून मधून विसावा घेत असत.

सर्व प्रयोग झाल्यावर प्रकृतिस्वास्थासाठी कंपनीची सुट्टी झाली. सुट्टी होऊन महिना दीड महिना झाल्यावर भाऊराव बडोद्यास उन्हाळा जास्त म्हणून पुण्याला आले. सकाळीं पुणें स्टेशनवर त्यांना उतरून घ्यायला मी व शंकरराव असे गेलों. भाऊराव फार अशक्त झाले होते. सबंध शरीरावर पिवळट रंग आला होता. आल्या दिवशींच सायंकाळीं पर्वतीकडे फिरायला गेले. परंतु चालतांना त्यांचा श्वासोच्छास फार जलद होऊं लागला. रात्रीं निजल्यानंतर मध्यरात्रीनंतर त्याना श्वास सुरू झाला व फार घाबरले व पलंगावरून उठून, मी निजलों होतों तेथे येऊन मला हाक मारली. मी उठून त्यांच्याजवळ गेलों व त्यांच्या छातीस ओरिएन्टल बाम चोळलें. अर्ध्या तासानें त्यांना झोप लागली. सकाळीं उठल्यावर शंकरराव आले. त्यांना म्हणाले, ' मला वैद्याचें औषध द्या. ' पुण्यास त्या वेळीं कृष्णशास्त्री माटे म्हणून वैद्य होते. त्यांना बोलावून आणून औषध सुरू केलें. असा

पांचसहा दिवस रात्रीं श्वास लागायचा, सकाळीं थोडें बरें वाटायचें. मे महिना असल्यामुळे उकाडा मनस्वी होत होता. एक सप्तक औषध घेऊन बरें वाटेना. प्रसिद्ध भिषग्वर अण्णासाहेब पटवर्धन यांना आणून प्रकृति दाखविली. तपासून त्यांनीं सांगितलें, पोटांत ट्रॅन्सवालची लढाई सुरू आहे. निदान झालें की जलोदर आहे. त्यांनी औषध सुरू करतों म्हणून सांगितलें. बत्तीस काष्टौषधींचा काढा व त्यांत ताम्रभस्म देणेचें ठरविलें. कृष्णशास्त्री माटे यांच्या हस्तें औषध सुरू झालें. पथ्य असें होतें–अन्न नाहीं, पाणी नाहीं. गाईच्या दुधांत बरोबरीनें पाणी घालून लोखंडाच्या कढईंत उकळून, पाणी जाळून टाकून उरलेलें दूध, पितील तितकें प्यायला द्यावें, असें सांगितलें. असें पथ्य पांच सहा दिवस केल्यावर पांचवे दिवशींच तहान फार लागली. तेव्हा ते वैतागानें म्हणाले, " मेलों तरी हरकत नाहीं, परंतु मी आतां पाणी पिणार. " मीं माटे वैद्यांकडे जाऊन त्यांना हकिकत सांगितली. ते म्हणाले, " दोन दिवस दम काढला तर बरें. परंतु आवश्यकच असेल तर, शेरभर पाणी लोखंडी कढईंत उकळून आटवून अर्धा शेर उरवून गार करून द्यावें. मात्र पाणी पिण्यास देतेवेळीं साळीच्या लाह्या दळून, त्या पिठांत पिण्याचें तयार केलेलें दूध घालून तें पीठ खायला देऊन वर थोडें पाणी द्यावें." त्याप्रमाणे केलें. परंतु त्यांनी तें कालवलेलें पीठ सरासरी मोठ्या सुपारीएवढें खाऊन वर एक पाण्याचा घोट घेतला व पुरे म्हणाले. एक सप्तक औषध झाल्यावर अण्णासाहेब पटवर्धनांनीं तपासून असें सांगितलें की, दूध प्यायचें तें प्यालेंच पाहिजे. त्याचप्रमाणें वर सांगितलेलें पीठ व पाणी जरूरीप्रमाणें द्यावें. औषध चालू होतेंच. मस्कती डाळिंबें व सफरचंद खाण्यास सांगितलें. हें चालू झाल्यावर प्रकृतींत फरक पडूं लागून सुधारणेकडे प्रकृति वळूं लागली.

आपण लवकर बरें न झालों तरी कंपनीचा गाडा चालू ठेवण्याचे प्रयत्न या काळांत सुरू झाले. भाऊरावांनी शंकररावांना कळवून सांगितलें की, " माझ्या डोळ्यांदेखत कंपनी सुरू झाली नाही तर मला सुखाने मरण येणार नाहीं." मुख्य नायकाच्या कामासाठी माणसें शोधण्याचा प्रयत्न सुरू झाला. उमरावतीचे वेडेकर, गोविंदराव धारप व सोलापुरचे काडगांवकर व दत्तोबा

हल्याळकर यांच्यासंबंधी विचारविनिमय सुरू झाला. याच वेळीं लोकमान्य टिळकांच्या लॉ क्लासमध्ये नारायण दत्तात्रय ज़ोगळेकर हे वकिलीचा अभ्यास करीत होते. त्यांचें गाणें भाऊरावांनी ऐकलें व जोगळेकरांबद्दल खटपट करण्यास शंकरावांना सांगितलें. लोकमान्यांच्या संमतीने जोगळेकर कंपनींत येणेचें ठरलें. कृष्णराव गोरेही ग्वाल्हेरीहून तेथील राजकृपेचें सुख अनुभवून त्रासून परत आले.

जुलै महिन्यांपर्यंत भाऊराव घरांतल्या घरांत फिरूं लागले होते. सतत तीन महिने अंथरुणांत पडून राहिल्यामुळे ते त्रासले होते. त्यांनी अण्णासाहेब पटवर्धनांना विचारलें की, " मी गाडींतून फिरायला जाऊं कां ? " अण्णा-साहेबांनी नको म्हणून सांगितलें. ते म्हणाले, गाडीच्या हबक्याने लिव्हरला त्रास होईल. परंतु माटे वैद्यांची संमति घेऊन ते गाडींतून फिरायला गेले. तिसरे दिवशीं रात्रीं फिरून पहिला दिवस उगवला. रात्रीं श्वास लागला. अण्णासाहेब पटवर्धन थोडे रागावले. पुन्हा औषधोपचार केल्यावर बरें वाटलें. कंपनीचे पहिले मॅनेजर त्र्यंबकराव साठे यांनी मिरजेस डॉ. वानलेस यांस दाखविण्यास जावें असें सुचविलें. त्या अगोदर रामभाऊ किंजवडेकर भाऊरावांना भेटण्यासाठी ग्वाल्हेरहून कायम पुण्यास आले. ग्वाल्हेरहून इंदूरास आल्यावर रामभाऊ निवृत्त होणार हें ठरलें असून भाऊरावांना अत्यवस्थ पाहून पुन्हा त्यांना मालकीचा लोभ उत्पन्न झाला व म्हणाले, मी कुठें कंपनी सोडली आहे ? त्यांची मनोवृत्ती पाहून भाऊराव अतिशय कष्टी झाले व भाऊरावांनींच आपली फारकत करून घेतली व हक्कापोटीं दोन हजार रुपये घेऊन त्या पैशाचा विनियोग बडोद्यास एक स्कॉलरशिप ठेवण्यांत केला. पुण्यास भाऊरावांनी आपलें मृत्युपत्रही केलें. त्यांत आईला एक जमीन व बहीण (करंदीकर) हिला बडोदा राज्यामधील एक जमीन दिली. आईला पुण्याजवळ रहाटणीस एक जमीन घेतलेली दिली. बाकीची सुमारें पंधरा ते वीस हजारांची इष्टेट कुटुंबास दिली.

सप्टेंबरमध्ये किर्लोस्कर मंडळींतील मंडळी मिरजेस जमूं लागली. सहा महिने कंपनी बंद होती, तरी गडीमाणसांपैकीसुद्धां सर्व लोक घरीं राहून

पद्रमोड करून कसें तरी जीवन जगत होती. परंतु कंपनी सोडून गेले नाहींत. कंपनीचा न्हावी तुकाराम हा काही दिवस घरीं राहून नंतर पुण्यास हजामती करून कंपनीच्याच बिऱ्हाडांत स्वत: भाकरी करून खात दिवस कंठीत होता. कंपनीचा अभिमान प्रत्येकाच्या रोमारोमांत भिनलेला होता.

मिरजेस जोगळेकरांसह सर्व मंडळी जमली. देवल मास्तर आले, व जोगळेकरांस शारदेंतील कोदंडाची भूमिका शिकवायला सुरुवात झाली. संध्याकाळीं जोगळेकर भाऊरावांकडे पदें शिकायला जाऊं लागले. भाऊरावांना मिरजेच्या अधिपतींनी सरकारी दवाखान्यांत चारपांच खोल्या राहावयास दिल्या होत्या. मिरजेस आल्यावर भाऊरावांना डॉ. वानलेस यांनी तपासून जवळजवळ निराशाच व्यक्त केली, परंतु औषध सुरू करून नेहमीचें अन्न खाणेस हरकत नाही असें सांगितलें. अन्न खाऊं लागल्यावर सात आठ दिवसांत सर्वांगास सूज येऊं लागली. तेव्हा डॉक्टरचें औषध बंद केलें व पुण्याहून अण्णासाहेब पटवर्धनांना, ते रागावले होते तरी समजूत करून, आणलें. त्यांचें औपध सुरू केल्यावर सूज उतरायला सुरुवात होऊन मंडळी मिरजेस जमली. एके दिवशीं आम्ही भेटीस गेलों. तेव्हा भाऊरावांनी सांगितलें आज सर्वांगावरची सूज अगदी नाहीशी झाली आहे. याप्रमाणे किर्लोस्कर मंडळी मिरजेस येऊन देवलांचें जोगळेकरांना शिक्षण सुरू झालें व भाऊराव पदें शिकवीत असत.

किर्लोस्कर मंडळीचा आता, प्रथम प्रयोग ता. ३१ आक्टोबर १९०० सन या दिवशीं, १८८० सालच्या प्रथम शाकुंतल प्रयोगाप्रमाणे व्हावा अशी शंकररावांची इच्छा होती. परंतु देवल मास्तरांना हें पटलें नाही. त्यांनी सांगितलें की, जोगळेकर या नवीन नटाला मुख्य नायकाच्या कामीं चांगलें यश मिळावें म्हणून त्यांच्या भूमिकेवर [ कोदंडाच्या ] जास्त मेहेनत घ्यायला पाहिजे. याबद्दल शंकरराव व देवल मास्तर यांचें भांडण होऊन देवल मास्तर तालीम सोडून निघून गेले. देवल मास्तरांचें म्हणणें रास्त होतें, परंतु तें मान्य न झाल्यामुळे देवल मास्तरांच्या शिक्षणाला जोगळेकर व किर्लोस्कर कंपनी मुकली.

नंतर तालमी होऊन ता० ३१।१०।१९०० रोजीं जोगळेकर शारदा

नाटकांत रंगभूमीवर आले. या प्रयोगाला भाऊराव थिएटरमध्ये आले, एक अंक त्यांनी पाहिला व जोगळेकरांबद्दल आशादायक उद्गार काढून, आपल्या डोळ्यांदेखत कंपनी पुन्हा सुरू झाली, या आनंदांत निघून गेले. त्यानंतर मृच्छकटिकच्या रंगीत तालमीलाही ते आले होते. मिरजेच्या सांगलीकरांच्या मळ्यांत सांगलीचे अधिपती श्री. तात्यासाहेब यांनी वीरतनय नाटकाचा खास प्रयोग करविला होता. त्या प्रयोगालाही भाऊराव एक अंक पाहून गेले.

पुन्हां प्रकृति बिघडूं लागली, म्हणून डिसेंबर अखेरीस अण्णासाहेब पटवर्धनांच्या देखरेखीखाली औषधोपचार करण्यासाठी पुण्यास जायचें ठरलें. त्याप्रमाणे ते पुण्यास जाण्यासाठी निघाले, स्टेशनवर मंडळी पोचवायला गेली होती. निरोप देतांना मंडळींनी "लवकर बरे होऊन या" असें सांगतांच, भाऊरावांना गहिवर आला. परंतु तो दाबून मुद्दाम हसू आणून त्यांनी "बरें आहे" असें म्हटलें. परंतु त्या आणलेल्या हास्यांत निराशा मूर्तिमंत दिसली.

पुण्यास गेल्यावर इचलकरंजीचे अधिपति श्री. बाबासाहेब यांनी आपल्या वाड्यांत त्यांना राहायला जागा दिली. औषधोपचार चालू होते. पुढे सर्वांगाला पुन्हा सूज येऊं लागली. बडोद्याहून त्यांचे बंधु अप्पाराव आले होते. शुश्रूषेला भाऊरावांची पत्नी, कृष्णाप्पा, व व्यंकटराव भडसावळे ( पनवेलकर ) एवढी मंडळी होती. कंपनी त्या वेळीं निपाणी येथे होती. ज्या दिवशीं त्यांचें प्राणोत्क्रमण झालें, त्या दिवशीं सकाळीं सहज वीरतनयांतील शूरसेनाचें पद "तूं अनाथ नाथ अशी तुझि कीर्ति दिगंतीं गाजे" हें पद म्हणून आवाज अजमासून पाहूं लागले, तेव्हा व्यंकटराव म्हणाले, "काय, गण्याची लहर लागली वाटतें!" त्यावर भाऊराव म्हणाले "अरे, आवाज पूर्ववत आहे कीं नाहीं तें पाहतों. आवाजाशिवाय भाऊ कोल्हटकर असून नसून सारखाच. आवाज नसला तर मृत्यूच योग्य." त्या दिवशींच ते दिवंगत होतील असें वाटलें नव्हतें. शंकररावांनी एकदां उभ्या उभी कंपनीकडे जाऊन येतों असें सांगितलें व ते सायंकाळीं मेलमध्ये बसले. रात्रीं १ वाजतां भाऊराव कैलासवासी झाले.

संगीताचा कोहिनूर गळून पडला. मिरज स्टेशनवर शंकररावांना तार मिळाली. ते तसेच मिरजेहून परत पुण्यास गेले. पुण्यास जवळ कोणी माहीतगार मंडळीं नसल्यामुळे, प्रेतसंस्कार थोड्या मंडळीसह उरकण्यांत आला. अशा थोर गायक नटाच्या अंत्य संस्काराला जातां आलें नाही, कुणालाच कळलें नाही, म्हणून पुण्यांतील लोक फार हळहळले. अशा प्रकारें अठरा वर्षें आपल्या गंधर्वतुल्य गायनाने जनतेला आनंद देणारा संगीतश्रेष्ठ हरपला. निपाणीस बातमी कळली. कंपनींतील लोकांना वज्राघात झाल्यासारखा झाला. त्या दिवशींचा प्रयोग बंद ठेवला.

भाऊराव कोल्हटकर अत्यंत देखणे होते. उत्तम गौरवर्ण, नाक धारदार नीटस, केस कुरळे व हातपाय नाजुक होते. स्वभाव प्रेमळ व निगर्वी होता. ते कंपनींत गादीवर बसलेले पाहिले म्हणजे मूर्तिमंत वैभव वाटे. अठरा वर्षांत त्यांचा एकदाच आवाज बसला होता. इंदूर येथे कंपनीच्या एका शाकुंतल नाटकाचे दिवशीं त्यांना आवाज बसल्यासारखा वाटला. म्हणून त्यांनी प्रयोग बंद ठेवा असें म्हटलें. परंतु कंपनीतील मंडळीना वाटे भाऊरावांचा आवाज कधीच खराब होत नाही, म्हणून, " सायंकाळपर्यंत होईल आवाज दुरुस्त " म्हणून प्रयोग करायचें ठरलें. तिसऱ्या अंकांत एका पदाला वर आवाज नेल्यावर आवाज चिरकला. त्यामुळे भाऊराव चिडले व तो प्रयोग संपल्यावर, प्रयोग बंद करून कंपनीस सुट्टी देऊन औषधोपचारासाठी पुण्यास डॉ. गर्दे यांचेकडे गेले. हा एकदाच अठरा वर्षांत आवाजाने धोका दिला. भाऊराव धार्मिक वृत्तीचे होते. रोज स्नान झाल्यावर शिवलीलामृताच्या निदान पांच ओव्या तरी वाचल्याशिवाय अन्नग्रहण करीत नसत. बडोद्यास असले म्हणजे निळकंठेश्वराच्या गाभाऱ्यांत स्नान केल्यावर जाऊन " पहा पहा काय सुंदर " हें पद आळवून आळवून म्हणण्याचा कार्यक्रम असे. त्या वेळीं संगीतशोकीन तें गायन ऐकायला टपून असत.

गाणें ऐकण्याची कुणी इच्छा दर्शविली तर ते म्हणत, मी गवई पेशाचा नाही. माझें गाणें रंगभूमीवर ऐकायला सांपडतें. अण्णासाहेबांनी भाऊरावाना दोन गोष्टी सांगितलेल्या त्यांनी आमरण पाळल्या. एक खासगी

रीतीने गाण्याला जायचें नाही व नित्य लोकांच्या दृष्टीस न पडणें. ते म्हणत, " भाऊ दृष्टीस केव्हा पडेल " अशी उत्कंठा लोकांत राहिली पाहिजे. खाण्यापिण्यांत भाऊराव कसलेंही पथ्य संभाळीत नसत. फक्त बर्फ घातलेलें पाणी अगर बर्फाचें कसलेंही पेय पीत नसत. नाटकाच्या दिवशीं एकादशी व्रताप्रमाणे तो दिवस कटाक्षाने पाळीत असत. अत्यंत माफक जेवण. मोठ्याने, फार मोठ्याने बोलणें नाहीं. एका व्यसनाच्या आहारीं दुर्दैवानें गेले होते, तेंही व्यसन आजारी पडल्यापासून त्यांनी अजिब्रात सोडलें होतें.

भाऊरावांना एकंदर आठ मुलें, एक जुळें धरून, झालीं. परंतु एकच मुलगी चार वर्षें वयापर्यंत जगली होती. भाऊरावांच्या पश्चात त्यांच्या पत्नी श्रीक्षेत्र वाई येथे आपल्या वडिलांच्या घरांत राहत. पुढे त्यांनी एक मुलगा दत्तक घेतला. तो वाई येथे राहत असतो. थोरले बंधु अप्पाराव यांना एक मुलगा होऊन वारला. नंतर त्यांना संतति झाली नाही. धाकटे बंधु गणपतराव 'यांचा वंश बडोद्यांत आहे.

भाऊरावांनी बडोद्याच्या आपल्या एका स्नेह्याला त्याच्या धंद्यासाठीं पांच सहा हजार रुपये कर्जाऊ दिले होते. तो स्नेही अवचित वारला. त्याच्या घरच्या मंडळीकडून पैसे वसूल झाले असते. परंतु स्नेही होता, त्याच्या कुटुंबीयांवर त्यांनी फिर्याद न करतां नुकसान सोसलें. भाऊराव उत्तम हिशेबी होते. कंपनीचे जमाखर्च दोनतीन दिवसांनी तपाशीत असत. सकाळीं उशीरा उठत; नंतर चहा होऊन मंडळीची पंगत बसली की, ते स्नानास उठत; जेवण झाल्यावर नुसती सुपारी व वेलदोडा व लवंग खात असत. सायंकाळीं चहा घेत नसत. फक्त नाटकाचे दिवशीं थिएटरमध्ये जायच्या अगोदर आलें घातलेला चहा घेत असत. अशी त्यांची दिनचर्या होती.

भाऊरावांचा आवाज पल्लेदार, मधुर असा होता. त्यांचें गाणें लांबून ऐकणाराला एखादा तेरा चौदा वर्षांचा बाळ आवाजाचा मुलगा गात आहे असा भास व्हावा. तसेंच वीररसात्मक गाणें म्हणतांना जवळ बसणारा दचकावा व कानाचे दडे बसावेत असा आवाज ऐकूं येई. रबराप्रमाणे

लवचीक लहान, मोठा, मधुर असा आवाजाचा धर्म होता. तान दाणेदार व सुस्पष्ट व तयारीची असे. पदांतील शब्दोच्चार स्पष्ट असत. वीररस व करुणरस हे रस गाण्यांत फार प्रभावीपणें प्रकट होत असत. सुभद्रा, शकुंतला, मंथरा, पुंडरीक, चारुदत्त, शूरसेन व कोदंड या भूमिका अविस्मरणीय अशाच राहिल्या. १८८२ सालापासून व मीं नाट्यसृष्टींत प्रवेश केल्यापासून असा आवाज अजून ऐकला नाही. भाऊरावांच्या गाण्यांत टप्पा, ठुंबरी, व लावणीचा ढंग असे. तशी लावणीची तान पुन्हा ऐकायला मिळाली नाही. भाऊराव किती स्वरूपसुंदर होते, व त्यांचे अवयव, मधुर आवाज, नाजूकपणा व गौरवर्ण स्त्री भूमिकेला किती अनुरूप होता याबद्दल एक घडलेली हकिकत—

इंदूर येथे असतां, होळकर नरेशांनी महू येथील इंग्रजी छावणींतील इंग्रज पाव्हण्यांना शाकुंतल नाटकाचा प्रयोग दाखविणेचें ठरवून अण्णासाहेबांना तशी आज्ञा केली. महू येथे प्रयोग चालू असतां भाऊरावांची शकुंतलेची भूमिका पाहून एका इंग्रज ऑफिसराचा व त्याच्या बायकोचा वाद सुरू झाला. ऑफिसर म्हणे हा नट पुरुष आहे; त्याची बायको म्हणे ही खरी स्त्री आहे. शेवटीं या वादाचा निकाल आंत येऊन भाऊरावांना समक्ष पाहिल्यावर व त्यांच्या डोक्यावरचा कृत्रिम केसाचा टोप पाहून मिटला.

भाऊरावाच्या मृत्यूने नाट्यकलेची हानि किती झाली हें प्रख्यात पुढारी शिवराम महादेव परांजपे यांनी एका वाक्यांत सुंदर रीतीने सूचित केलेलें आहे. भाऊरावांच्या मृत्युलेखांत त्यांनी "लास्ट ऑफ दि रोमन्स" ( सर्वश्रेष्ठांतला शेवटचा पुरुष ) असें अत्यंत मार्मिक वर्णन भाऊरावांचें केलें होतें. भाऊराव हे खरोखरच रंगभूमीवरील सर्वश्रेष्ठांतले शेवटले महापुरुष होते.

# ६ : गणपतराव जोशी

महाराष्ट्र रंगभूमीवरील महान प्रभावी नट आणि गद्य नाटकांचे कंठमणी गणेश कृष्ण जोशी यांचा जन्म ता. १५ आगष्ट सन १८६७ सालीं रत्नागिरी जिल्ह्यांतील ता. राजापुर येथे झाला. त्यांचे पूर्वज आडिवरे गांवांत नांदले. परंतु गणपतरावांच्या वडिलांना त्यांच्या चुलत्याने ते अल्पवयी असतांना राजापुरास नेलें. त्यांच्या घराण्यांत खोती होती, ती आजोबांच्या वेळींच गेली होती. त्यामुळे गणपतरावांच्या वडिलांची राजापुरांतच वस्ती झाली. गणपतराव पुळयाच्या श्रीगणपतीला नवस करून झाल्यामुळे त्यांचें नांव गणपति असें ठेवलें गेलें व त्यांची मुंजही तेथेच झाली. गणपतराव प्राथमिक शाळेंत शिकत असतां त्यांचे शिक्षक त्यांना कविता मोठमोठ्यानें म्हणायला लावीत असत. विद्यार्जनासाठी गणपतराव आपल्या एका आप्ताकडे असतांना त्यांना म्हशीचें सर्व काम करायला लावलें होतें. त्या आप्तांच्या कुटुंबाचे कटु शब्द ऐकून ऐकून गणपतरावांनी वैतागाने खाडींत उडी टाकून आत्महत्त्येचा प्रयत्न केला. त्यांनी पाण्यांत उडी टाकली, परंतु ज्या म्हशीची त्यांनी देखभाल केली त्या म्हशीनें पाण्यांत जाउन आपल्या शिंगावर गणपतरावांना घेऊन काठावर आणलें. नंतर ते एकदा वैतागाने एका पारावर बसले असतां, एका फकिराने त्यांचें शांतवन करून त्यांना एक माळ दिली व तुझा भाग्योदय होईल, असा आशीर्वाद दिला होता. लहानपणीं गणपतरावांना गीता पाठ करायचा अभ्यास होता. त्यामुळे त्यांची वाणी शेवटपर्यंत अस्खलित राहिली.

वयाच्या आठव्या वर्षी गणपतरावांची मुंज गणपतीचे पुळे येथे झाली. पुढे लवकरच गणपतरावांचे वडील वारले व वडिलांची मिळकत बंद झाली. गणपतराव रामदासांचे श्लोक म्हणून कोरान्न मागूं लागले. तेव्हा एक कोल्हेकर नाटक मंडळी पौराणिक नाटकें करीत असे. त्या कंपनींत ते पळून गेले. तेथून त्यांना शोध करून परत आणण्यांत आलें. नंतर कांही

दिवसांनी कृष्णाजी बजाजी जोशी नांवाचे गृहस्थांनी श्री शाहूनगरवासी या नांवाची नाटकमंडळी काढली.

सुस्वरूप मुलाच्या शोधांत त्यांची व गणपतरावांची गाठ पडून गणपतराव त्या नाटक मंडळींत गेले. गणपतरावांना सर्व आयुष्यांत एकदाच स्त्री भूमिका — तीही सरस्वतीची — करावी लागली होती. अशा रीतीने फिरत, पौराणिक नाटकें व गद्य नाटकें करीत करीत श्री. शाहूनगरवासी नाटकमंडळी १८९० च्या सुमारास कोल्हापुरास आली होती. तेथे प्रयोग करीत असतां कोल्हापुरच्या रसिक मंडळींचें या कंपनीकडे लक्ष वेधलें. मिरजेचे त्या वेळचे म्यु. सेक्रेटरी त्र्यंबकराव यांनी पुण्याचे प्रो. वासुदेवराव केळकर (त्राटिकाकर्ते) यांस श्री. शाहूनगरवासी मंडळीवर कृपादृष्टि ठेवण्याची विनंति केली होती. १८९१ सालीं शाहूनगरवासी मंडळीने गोविंद वासुदेव कानिटकर यांचें हॅम्लेटचें भाषांतर ' वीरसेन ' नाटक हें बसविलें होतें. परंतु कानिटकरांचें व त्यांचें बिनसलें. नंतर त्यांनी प्रि. गोपाळराव आगरकर यांचें ' विकारविलसित' नाटक बसवून प्रयोग चालू केले. प्रो. केळकर यांच्या सहवासाने हॅम्लेटची भूमिका गणपतरावांची यथायोग्य तयार झाली. हॅम्लेटच्या भूमिकेचीं मर्मस्थानें केळकरांनी समजून देऊन भूमिका तयार करविली.

पुण्याच्या मुक्कामांत वासुदेवराव केळकरांनी गणपतरावांची लांब शेंडी व घेरा काढून टाकून इंग्लिश कट केस ठेवायला लावले. १८९३ सालीं त्राटिका नाटक केळकरांनी लिहून शाहू नगरवासी मंडळीकडून रंगभूमीवर आणविलें. तें अतिशय गाजलें. या नाटकांत गणपतराव प्रतापरावाची भूमिका करीत असत, ती फार बहारीची होत असे. यानंतर गणपतरावांनी अनेक भूमिका केल्या व त्या सर्व उत्तम गाजत असत. १९०१ सालीं शिरवळकरांचें ' तुकाराम ' नाटक रंगभूमीवर आलें. त्यांत गणपतराव तुकारामाची भूमिका उत्तम करीत. भाविक लोकांना प्रत्यक्ष तुकारामच आपल्यासमोर आहे असें वाटत असे. १९०३ सालीं त्यांची प्रथमपत्नी निवर्तली. त्यांना एकच अपत्य—मुलगी तेवढी राहिली.

गणपतरावांची हॅम्लेटची भूमिका अविस्मरणीय अशी झाली. तशाच त्यांच्या सर्व वीररसप्रधान भूमिका अत्यंत प्रभावी व परिणामकारक होत

असत. हॅम्लेट नाटकांतील प्रथम प्रवेशांतील आत्मगत, पिशाच्चासमोरचा प्रवेश, आईच्या निर्भर्त्सनेचा प्रवेश, हे प्रवेश; व " जगावें कीं मरावें, " तसेंच " आतां मी एकटा आहे, " हीं आत्मगतें फारच उत्तम होत असत. गणपतरावांची हॅम्लेटची भूमिका पाहून इंग्रज प्रेक्षकांनीसुद्धा प्रशस्ती केली होती. भाषा कळली नाहीं तरी इंग्रजी प्रेक्षकांना गणपतरावांनी आपल्या अभिनयानें मान डोलवावयाला लावली आहे.

' राणा भीमदेव ' नाटकातील रजपूत सैन्य पळत सुटलें आहे, त्या प्रवेशांत गणपतराव राणा भीमदेवाच्या भूमिकेंत रंगभूमीवर रौद्ररसात्मक आवेशयुक्त प्रवेश करीत असत. त्या वेळचा त्यांचा पोपाक रक्ताचे डाग पडलेला, व हातांत रक्तानें भरलेली तरवार असून, हात रक्तानें माखलेले असत. " अहारे बेहिमती कशाला रजपूत झालांत " या भाषणानें ज्याला आवेश येणार नाही, तो सजीव माणूस नव्हे, असें प्रभावी भाषण व अभिनय ते करीत असत. चंपावतीला " जयसिंह मेला " हें सांगायला येत असत, त्या वेळीं, ते जो अभिनय करीत व भाषण करीत त्याला तोडच नाही.

मीं १८९६ सालीं, त्राटिका, हॅम्लेट, बाजी देशपांडे, पानिपतचा मुकाबला, राणा भीमदेव, मर्कटजीचा सूड हें प्रो. केळकरांचें नाटक, हीं नाटकें पाहिलीं. त्या वेळीं माझ्या मनावर झालेला प्रभाव शेवट-पर्यंत यत्किंचित कमी झाला नाही. आणि " याच्यासम हा " हेंच अखेर तोंडांतून निघतें.

शाहूनगरवासी कंपनीच्या अव्यवस्थित कारभारानें कंपनीला मधूनमधून आर्थिक अडचणी येत. त्या लोकांच्या मदतीनें निभावूनही जात. शेवटीं-शेवटीं गणपतरावांनी मुदतीबाहेर गेलेलीं कर्जेंही दानतीनें फेडली. व कंपनी निष्कर्जी केली. गणपतराव धार्मिक वृत्तीचे आणि साधारणतः विरागीच होते. गणपतरावांशीं बोलत बसण्याची मला मधूनमधून संधि मिळे. त्या प्रत्येक वेळीं ते मनमोकळेपणानें बोलत असत. परंतु एखाद्या तत्व-वेत्त्याप्रमाणें त्यांची मुद्रा गंभीर असे. असा हा महान प्रभावी गद्य नट शेवटीं सांगलीला आला असतां, मी त्यांना भेटायला गेलों असतां, ज्या नटाच्या चेहऱ्यावरची टवटवी कधी कमी झालेली नव्हती, त्या गणपतरावांचा

चेहेरा ओढलेला, मिशा काढलेल्या, अशा स्थितींत पाहून फार वाईट वाटलें. पुढे थोड्याच दिवसांत या महान नटाचें देहावसान झालें. ता. ७ मार्च सन १९२२ रोजीं हा नाट्यकलेचा कंठमणी व रंगभूमीवरचा दैदीप्यमान तारा निखळून पडला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों. दि. ..................

कृष्णाजी महादेव ऊर्फ

# ७ : बाळाभाऊ जोग

बाळाभाऊंचा जन्म सन १८६८ सालीं साखरवाडी नांवाच्या कोकणांतील राजापूर तालुक्यापैकी एका गावीं झाला. सदर जोग घराणें जयगडपैकी नांदिवडे येथील घराणें होय. या घराच्यापैकी गणेश नांवाचे गृहस्थ साखरवाडीस येऊन राहिले. बाळाभाऊंचे वडील महादेवराव हे साखरवाडीस स्थाईक होते. बाळाभाऊंची भार्या रुक्मिणी देवाचें गोठणे येथील आपट्यांच्या घराण्यांतील. मातुश्रीचें नांव पार्वती. बाळाभाऊंना एक मुलगा झाला. त्याचें नांव पांडुरंग. मुली दोन; एक गंगू, तिचा भ्रतार बळवंत भिकाजी बापट मु. पडवें. दुसरी मुलगी सीता--भ्रतार केशव महादेव बोडस, पुणें. बाळाभाऊंच्या सुनेचें नांव रमा असें होतें. बाळाभाऊंचे एक आप्त ( चुलते असावे ) नागपुरास सरकारी अंमलदार होते, तेथे बाळाभाऊंचें इंग्रजी तिसऱ्या इयत्तेपर्यंत शिक्षण झालें होतें. बाळाभाऊ घरीं कोकणांत असतां नाटक मंडळींत पळून गेले. एका स्नेह्याची व त्यांची मसलत ठरली. रात्रीं सोप्यावर निजले असतां पहाटे एक लांकडाचा ओंडका आणून तो अंथरुणावर ठेवून त्याला पांघरूण घालून, माणूस निजला आहे, असा भास उत्पन्न करून, ते खाडींतल्या होडींत बसून, गोव्याला पळून जाऊन "श्री शाहूनगरवासी मंडळींत दाखल झाले. त्या मंडळींत सरस्वतीचें वगैरे अशीं दुय्यम कामें करीत असतांना त्या कंपनींतील हरि नांवाचा नायिकेचें काम करणारा मुलगा कॉलऱ्याने आजारी झाला असतां बाळाभाऊंनी आयत्या वेळीं "कचदेवयानी" प्रयोगांत देवयानीची भूमिका केली. हरि हा कॉलऱ्याने दिवंगत झाल्यामुळे पुढे बाळाभाऊच नायिकेच्या भूमिका करूं लागले. बाळाभाऊ हे अभिनयाचे अतिशय चिकित्सक असत असें ऐकलें. त्यांच्या त्राटिका, चंपावती, दर्याबाई या भूमिका विशेष प्रसिद्ध होत्या. लेखकाने बाळाभाऊंच्या त्राटिका व चंपावती या भूमिका समक्ष अनेक वेळां संधि

काढून पाहिल्या होत्या. दर्याबाईच्या भूमिकेचा लौकिक ऐकला होता. हॅम्लेट-मधील मल्लिकेच्या भूमिकेंत तिला वेड लागल्यानंतरचा अभिनय फार प्रेक्षणीय होत असे.

बाळाभाऊ, झुंझारराव ( अथेल्लो )मध्ये जाधवराव ( अयागोची ) व तुकाराम नाटकात शिवाजीची, अशा दोन पुरुष भूमिका करीत असत. आवाज फार नरम असल्याने या भूमिका प्रसिद्धि पावल्या नाहीत. बाळाभाऊंचे स्त्री भूमिकेचा अभिनय अतिशय सभ्य होत असे. खानदानी स्त्रीचा आभास उत्पन्न करीत. बाळाभाऊंचा बांधा स्त्री भूमिकेला योग्य असाच होता. रंग गोरापान, भिवया चांगल्या, हातपाय गोंडस. सर्व सौंदर्यांत नाक चांगलें नसल्याने वैगुण्य वाटे. नाटक कंपनींतील मंडळीशीं बाळाभाऊ खेळीमेळीने वागत असस. अशा रीतीचा हा नामांकित नट १९१० सालीं आजारी होऊन राजापुरास दिवंगत झाला. बाळाभाऊंच्या निधनाची वार्ता ऐकून गणपतरावांना मोठा धक्का बसला व शोकविव्हल होऊन त्यांनी उद्गार काढले की, " माझा उजवा हात गळून पडला व मी पंगु झालों."

REFBK 0013222
REFBK-0013222
93222

## परिशिष्ट—१

### किर्लोस्कर कंपनीची हिस्सेरशी

मे १८८४ मध्ये पनवेलीस अप्पासाहेब गुळवे यांच्या घरीं किर्लोस्कर संगीत मंडळीची पद्धतशीर घटना होऊन भागीदारांची प्रथमच हिस्सेरशी ठरली ती अशी—

एक आणा—श्री. शंकर जयंती, गुर्लहोसूर
चार आणे—श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर
पावणे चार आणे—मोरो बापूजी देव, वाघोलीकर
साडेतीन आणे—लक्ष्मण बापूजी ( भाऊराव ) कोल्हटकर
एक आणा—गोपाळ नारायण दाते ( अण्णासाहेबांचे बालमित्र )
दीड आणा—गुड कॉन्डक्ट फंड ( वाटणीचे वेळीं पगारदाराचें सद्वर्तन ) योग्यता, उपयुक्तता पाहून देण्यासाठी.
सव्वा आणा—रिझर्व फंड.

---

## परिशिष्ट— २

### तन्नी-पत्त्यांचा एक खेळ

[ अण्णासाहेब किर्लोस्कर पनवेलीस मुक्काम करून असतां ' तन्नी ' नामक एक पत्त्यांचा खेळ खेळत असत, असें त्यांच्या चरित्रलेखांत म्हटलें आहे. अण्णासाहेबांच्या काळीं हा खेळ चांगला लोकप्रिय होता. या खेळाची आजच्या वाचकांना माहिती व्हावी म्हणून त्या खेळाचा तपशील येथे दिला आहे. ]

तन्नी हा एक पत्त्यांचा डाव आहे. हा खेळ पांच माणसांत खेळावयाचा असतो. पत्त्यांच्या बावन्न पानांपैकी दुरी तिरी व चवऱ्या हीं पानें काढून टाकावयाचीं आणि उरलेल्या चाळीस पानांनी हा डाव खेळावयाचा. खेळणाऱ्या पांच जणांत हीं पानें वाटावयाचीं. प्रथम तीन पानें प्रत्येकास द्यावयाचीं. पाने वाटणाराच्या उजव्या बाजूला जो माणूस बसला असेल त्याला फक्त हीं तीन पानें पाहण्याचा अधिकार असतो. हीं तीन पानें पाहून, त्याचे तीन हात होण्याचा संभव आहे, असें वाटल्यास, दुसरी वाटलेलीं पांच पानें त्याने एकदम अर्धवट उचलून पाहून, इच्छित रंगाचें हलकें पान खाली लावून, आठही पानें खाली ठेवायचीं. नंतर " एक दोन तीन " अशा जलद लयीने बाकीच्यांनी पानें ठेवायची. ज्याच्याकडे दोन

एक्के आले असतील त्याने " मदत " म्हणून ओरडायचें. तीन एक्के आले असल्यास त्याने " वरास " म्हणून ओरडायचें. असें ओरडणारा मग ज्याने प्रथम डाव ठेवला असेल त्याचा भागीदार व्हायचा.

एखाद्याने डाव ठेवल्यावर दुसऱ्या एखाद्याजवळ पांच हात होण्यासारखा रंग असल्यास त्याने ' थांबा ' म्हणून पांच हात सांगायचे. मग प्रथम डाव देणाऱ्याने आपले पांच हात होण्यासारखे असल्यास तसें सांगावें म्हणजे त्याचाच डाव कायम होतो. एखाद्याचा पहिलाच डाव कायम होऊनहि त्याने सहा हात केल्यास त्याला " ट्रुमकी कोट " केला असें म्हणावयाचें.

या खेळाचे कांही तांत्रिक नियम आहेत. पहिला डाव ठेवणाऱ्याने दुसरीं पांच पानें एकदम घालून ठेवलीं पाहिजेत. एकेक पान पाहतां येणार नाही. मदत देणाराने " मदत " अगर "वरास " म्हणून ओरडलें पाहिजे. पानें ठेवण्यास उशीर झाला तर डाव गेला. ठेवणाराची पाळी बाद झाली तर पुढल्या माणसाने " एक दोन तीन " असा एका दमांत उच्चार करून, त्याच लयींत पानांवर नजर टाकून, हलके पान खाली लावून, डाव ठेवावयाचा. सगळ्यांचीं पानें पाहून झाल्यावर आठ डाव म्हणजे कोट होईल असें वाटणाऱ्याने तसें सांगून " कोट " असें म्हणून डाव खेळावयाचा.

अण्णासाहेब किर्लोस्कर हा तन्नी खेळ खेळत त्याची पद्धत अशी असे. खेळणाऱ्या प्रत्येक मिष्टला कंपनींतून प्रत्येकी बारा रुपये ' भांडवल ' म्हणून देण्यांत येई. सुरुवातीला प्रत्येकाने आपल्या भांडवलांतून आपल्यापुढे दोन दोन रुपये लावावयाचे. ज्याचा डाव होईल त्याने सर्वांच्या पुढे ठेवलेले दोन दोन रुपये मिळून दहा रुपये उचलावयाचे. त्यांतील तीन ढीग म्हणजे सहा रुपये डाव ' घेतलेल्याचे ' व ' मदत ' आणि ' वरास ' म्हणून ओरडणाऱ्यांनी प्रत्येकीं दोन दोन रुपये द्यायचे. डाव लावणारा हरला तर त्याने, व मदतवाल्याचा एक्का मेला असल्यास त्याने, डाव गेल्याबद्दल प्रत्येक ढिगावर दोन दोन रुपये ठेवावयाचे. अशा रीतीने डावांत हरल्यामुळे ज्याचें भांडवल संपेल त्याने ज्याच्याजवळ गल्ला जास्त जमला असेल त्याच्याजवळ कर्ज मागायचें. त्याने दहा रुपये देऊन घेतांना व्याजाचे म्हणून दोन रुपये जास्त घेऊन बारा वसूल करावयाचे. ज्याचा ' ट्रुमकी कोट ' होईल त्याला प्रत्येक खेळणाराने दोन रुपये दक्षणा द्यायची. आठ हातीं कोट करणाराला आणखी दोन दोन रुपये मिळायचे. या खेळांत जो मनुष्य पांच कर्जें म्हणजे पन्नास रुपये हरेल, त्याचें दिवाळें निघालें असें समजून त्याच्या नांवाने " तख्त " वाजवावयाचें, म्हणजे खेळ खलास. भांडवलासाठी घेतलेले पैसे कंपनींत परत करावयाचे की झालें.